एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
१०४ शतकोत्तर वाटचाल
• मुंबई, मंगळवार १४ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४०, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 40 Marathi - Daily - Mumbai, 14 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
लेबनॉनमध्ये उभे राहून हिजबुल्लाहला थेट चॅलेंज?
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews



महामानव भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना
जयंतीनिमित्त
नवाकाळ परिवाराकडून
विनम्र अभिवादन

# स्वरस्वामिनी आशा भोसले पंचतत्त्वात विलीन
## सरकारी इतमामात अंत्यसंस्कार




■ मुंबई

**आठ दशकांपासून अधिक काळ आपल्या गायनाने जनसामान्यांचे अवघे जगणे सुरेल करणाऱ्या स्वरस्वामिनी आशा भोसले आज अनंतात विलीन झाल्या. त्यांच्या चाहत्यांनी साश्रूनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. सुदेश भोसले, शान या गायकांनी गाणी गाऊन त्यांना निरोप दिला. शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले, तेव्हा 'अभी ना जाओ छोडकर' अशी उदास, केविलवाणी भावना त्यांच्या असंख्य चाहत्यांच्या मनात दाटून आली.**

**सकाळी** त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी मुंबईतील त्यांच्या लोअर परळ येथील 'कासा ग्रांडे' इमारतीतील निवासस्थानी ठेवण्यात आले होते. त्यापूर्वी त्यांना तिरंग्यात गुंडाळून सलामी देण्यात आली. अंत्यदर्शनासाठी सकाळी अकरा वाजल्यापासून नामवंतांची रीघ लागली. सर्व क्षेत्रातील मान्यवर दर्शनाला येत होते. आशा भोसले यांच्याशी अत्यंत निकटचे संबंध असलेले मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांची पत्नी शर्मिला ठाकरे यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर राज ठाकरे बराच वेळ आशा भोसले यांच्या कुटुंबियांसोबत बसून होते. आशा यांच्या भगिनी मीना आणि उषा, पुत्र आनंद, त्यांची नात जनाई तिथे उपस्थित होते. उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे, पत्नी रश्मी आणि पुत्र आदित्य आले होते. आशा यांच्या आठवणीने उद्धव व रश्मी या दोघांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. अशीच अवस्था क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचीही झाली. त्यालाही अश्रू आवरता आले नाहीत. राज्यपाल जिष्णू देव शर्मा, मंत्री मंगलप्रभात लोढा, खा. सुप्रिया सुळे, सुशीलकुमार शिंदे, मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनीही दर्शन घेतले. अभिनेता रितेश देशमुख, तब्बू, नील नितीन मुकेश, जॅकी श्रॉफ, हरीहरन, राकेश रोशन, नीना गुप्ता, लेस्ली लुईस, विवेक ओबेरॉय, रणवीर सिंह, उदित नारायण आणि क्रिकेटपटू मोहंमद

पान २ वर

# अमेरिकेकडून होर्मुजची नाकेबंदी
## इस्त्रायल लेबनॉनची आज चर्चा



■ वॉशिंग्टन

**इराण** - अमेरिका युद्ध आता अत्यंत धोकादायक वळणावर येऊन ठेपले आहे. पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये झालेली बैठक निष्फळ ठरल्यानंतर संतापलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी रविवारी इराणची सागरी नाकेबंदी करण्याचा इशारा दिला होता. ट्रम्प यांनी इराणला आज सोमवारपर्यंतची मुदत दिली होती. या मुदतीत इराण नमते घेईल, अशी ट्रम्प यांना अपेक्षा होती. मात्र, इराण आपल्या भूमिकेपासून तसूभरही हलण्यास तयार नसल्याचे दिसताच ट्रम्प यांनी होर्मुजची नाकेबंदी सुरू केली. त्याचवेळी इस्त्रायल आणि लेबनॉन यांच्यात उद्या चर्चा होणार आहे. ही चर्चा यशस्वी झाली तर इराण आणि अमेरिका यांच्यात पुन्हा चर्चा होऊन मार्ग निघण्याची शक्यता आहे.

इस्त्रायल आणि अमेरिकेने युद्ध छेडल्यानंतर इराणने होर्मुजची सामुद्रधुनी रोखून ट्रम्प यांना जशास तसे उत्तर दिले. होर्मुज रोखल्यामुळे जगाची तेल चिंता वाढली. कच्च्या तेलाचे भाव प्रति पिंप ११० डॉलरच्या आसपास पोहोचले. स्वयंपाकाच्या गॅसचा

पान ७ वर

### लेबनॉन-इस्त्रायलची आज शांतता बैठक

इराण - अमेरिका चर्चा निष्फळ ठरल्यानंतर उद्या अमेरिकेत होणाऱ्या लेबनॉन - इस्त्रायल यांच्यातील शांतता चर्चेवरही प्रश्नचिन्ह लागले आहे. कारण युद्धविरामाच्या करारात लेबनॉनचा समावेश नको, अशी इस्त्रायलची भूमिका आहे. तर करारात लेबनॉनचा समावेश करण्यावर इराण ठाम आहे. दुसरीकडे इस्लामाबाद बैठक निष्फळ ठरल्यानंतर इस्त्रायलने रविवारी लेबनॉनची राजधानी बैरूतसह दक्षिण लेबनॉनमधील अनेक शहरांवर बॉम्ब हल्ले केले. एकंदरीत अशा परिस्थितीत लेबनॉन-इस्त्रायल बैठकीवर अनिश्चिततेचे सावट आहे.

## थोडक्यात

### उद्धव ठाकरे मे महिन्यात विदर्भात बैठका घेणार

**मुंबई** - उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मे महिन्यात विदर्भाचा व्यापक दौरा करणार असून, या दौऱ्याला सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी ठाकरे प्रत्येक जिल्ह्यात बैठका घेणार आहेत. या दौऱ्यात शाखाप्रमुख,



गटप्रमुख आणि इतर स्थानिक पदाधिकाऱ्यांसोबत सखोल चर्चा केली जाणार आहे. पक्षाची सध्याची स्थिती, संघटनात्मक ताकद, स्थानिक पातळीवरील अडचणी आणि आगामी निवडणुकांची तयारी याचा आढावा उद्धव ठाकरे घेणार आहेत. या भागात पक्षाची संघटना पुन्हा उभी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा ठरणार आहे.

### मुंबई शेअर बाजारात ७०२ अंकांची घसरण

**मुंबई** - इराण-अमेरिका यांच्यातील शांतता बैठक निष्फळ झाल्यामुळे जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फटका आज भारतीय शेअर बाजाराला बसला. सकाळी बाजार उघडताच मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स तब्बल १६०० अंकांनी तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १३०० अंकांनी कोसळला होता. बाजार बंद होताना सेन्सेक्स ७०२ अंकांच्या नुकसानीसह बंद झाला. तर निफ्टी २३,९०० च्या पातळीखाली बंद झाला. आज दिवसभरात एकूण १,७१६ कंपन्यांच्या समभागांमध्ये वाढ नोंदली गेली. तर २,४५३ कंपन्यांच्या समभागांमध्ये घसरण झाली. ऊर्जा, संरक्षण आणि दूरसंचार वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये आज घसरण दिसून आली. ग्राहकोपयोगी वस्तू, वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि नैसर्गिक वायू आदि क्षेत्रांमध्ये सुमारे १ टक्का घसरण झाली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्येही प्रत्येकी ०.५ टक्के घट नोंदली गेली.

# तीन राज्यांतील कामगारांचे उग्र आंदोलन
## पगार वाढवा | दगडफेक | जाळपोळ | अश्रुधूर

■ नोएडा

**दिल्लीसह** हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील औद्योगिक क्षेत्रात पगारवाढीच्या मागणीसाठी शेकडो कंत्राटी कामगार गेल्या तीन दिवसांपासून आपापल्या कारखान्यांबाहेर आंदोलन करत आहेत. नोएडा, दिल्ली, मानेसर (हरियाणा), फरिदाबाद, गौतम बुद्ध नगर येथील हे कामगार एकत्र रस्त्यावर उतरले. पगारवाढ करून किमान वेतन द्या, आठवड्याची सुट्टी, बोनस, ओव्हरटाईम यासाठी त्यांनी आंदोलन सुरू केले. काल रविवारी या आंदोलनाची दखल घेऊन तीनही राज्यांतील सरकारांनी बैठक घेऊन त्यांच्या मागण्या मान्य केल्या. मात्र कंपन्या सरकारचेही ऐकायला तयार नव्हत्या. कंपन्यांनी कोणतेही आश्वासन दिले नाही. त्यामुळे कामगारांचे आंदोलन सुरूच राहिले.



या आंदोलनाला आज नोएडात हिंसक वळण लागले. मदरसन कंपनीच्या गेटबाहेर कामगारांनी ठिय्या दिला असताना पोलिसांनी अश्रुधूर सोडला. यामुळे कामगार भडकले. त्यांनी मग दगडफेक करत वाहनांची तोडफोड केली. पोलिसांची जीप जाळली. बॅरिकेड पार करून कंपनीच्या कार्यालयात काचा फोडल्या. पोलिसांनी मोठ्या प्रयत्नाने हे आंदोलन नियंत्रणात आणले असले तरी वेतनाच्या प्रश्नावरून

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



कामगारांमध्ये खदखद असल्याने इथली परिस्थिती स्फोटक बनली आहे. सिंगूरमध्ये टाटा कंपनीच्या विरोधात कामगार असे आक्रमक झाले होते. त्यानंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर एकत्र येत रस्त्यावर उतरले आहेत.

नोएडाच्या औद्योगिक क्षेत्रामधील होजिअरी कॉम्प्लेक्समध्ये तयार कपड्यांचे ३०० कारखाने आहेत. त्यामध्ये हजारो कंत्राटी

पान ७ वर

# १२६२ शाळा बंदीचा मुद्दा तापला
## रोहित पवारांची भुसेंसोबत बैठक

■ मुंबई

**आमदार** रोहित पवार यांनी आज शिक्षण मंत्री दादा भुसे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन राज्यातील शाळांच्या विविध



प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. विशेषतः सुट्ट्यांच्या काळात शाळांची पट पडताळणी सुरू केल्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. तसेच सुमारे शाळांमध्ये शाळा बंद करण्याच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत शिक्षण मंत्र्यांनी २८ एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक बोलावली आहे.

आजच्या बैठकीला महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, इंडिपेंडंट इंग्लिश स्कूल असोसिएशन तसेच उर्दू शाळांच्या प्रतिनिधीही उपस्थित होते. सरकारने नुकत्याच काढलेल्या आदेशानुसार सुमारे १२६२ विना-अनुदानित शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या शाळांमध्ये बहुतांश मराठी माध्यमाच्या व काही उर्दू शाळांचा समावेश आहे. या निर्णयामुळे अडीच ते तीन लाख विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. या बैठकीनंतर रोहित पवार यांनी सांगितले की, अनेक शाळांचे प्रस्ताव विविध स्तरांवर प्रलंबित असताना अचानक असा आदेश काढण्यात आला.

# भोंदू खरातला तिसऱ्या गुन्ह्यात
## ७ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ नाशिक

**महिलांचे** लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणूक प्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात याला तिसऱ्या गुन्ह्यात न्यायालयाने ७ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. न्यायालयाने त्याला २० एप्रिलपर्यंत कोठडीत पाठवले असले, तरी सरकारी वकिलांनी चौथ्या गुन्ह्यात ताबा देण्याची मागणी केली. ही मागणी मंजूर करत न्यायालयाने खरातला एसआयटीच्या ताब्यात देण्याचा मार्ग मोकळा केला. चौथ्या गुन्ह्याप्रकरणी त्याला उद्या पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

खरातविरोधात आतापर्यंत सुमारे १४ गुन्हे दाखल असून, त्यात महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीचे गंभीर आरोप आहेत. एका गरोदर महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, सुनावणीदरम्यान न्यायालयाने पोलिसांकडून मारहाण होत असल्याची तक्रार आहे का, असा प्रश्न विचारला

पान ७ वर

# कोकणातील बागायतदार
## 'वर्षा' बंगल्यावर धडकणार

■ देवगड

**राज्य** सरकारने शक्तीपीठ महामार्ग असो की कुंभमेळा त्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले आहे. मात्र कोकणातील आंबा काजू बागायतदारांना ५० कोटींची मदत देण्यासाठी सरकारकडे पैसा नाही.



### 'स्वाभिमानी' संघटनेचे राजू शेट्टी यांचा इशारा

त्यामुळे मुख्यमंत्र्यांना जाब विचारण्यासाठी वर्षा बंगल्यावर धडक देण्याचा निर्णय येत्या शनिवारी रत्नागिरी येथील सभेत घेतला जाईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिला.

जामसंडे येथील सांस्कृतिक भवन येथे घेण्यात आलेल्या आंबा, काजू बागायतदार व व्यापारी महासंघ सिंधुदुर्ग यांच्या एल्गार मेळाव्यात राजू शेट्टी यांनी राज्य शासनाविरोधात पुढील आंदोलनाची दिशा जाहीर केली. राजू शेट्टी म्हणाले की, नुकसानभरपाईत झालेल्या फसवणूकीचा जाब विचारण्यासाठी आपल्याला मुख्यमंत्र्यांच्या मुंबई येथील वर्षा बंगल्यावर धडक द्यावी लागेल. त्याशिवाय प्रश्न सुटणार नाही. आपण धमकीला घाबरायचे नाही.

पान ७ वर

# सरकारच्या आश्वासनानंतर
## कंत्राटदारांचा संप स्थगित

■ मुंबई

**९० हजार** कोटी रुपयांची थकित बिले तत्काळ देण्याच्या मागणीवरून कंत्राटदारांनी पुकारलेला राज्यव्यापी संप सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आला.

महाराष्ट्र स्टेट कॉंट्रॅक्टर्स फेडरेशन, स्टेट इंजिनिअर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र स्टेट वॉटर सप्लाय कॉंट्रॅक्टर्स असोसिएशन या कंत्राटदारांच्या तीन प्रमुख संघटनांनी थकित बिलांची रक्कम त्वरित मिळावी यासाठी ७ एप्रिलपासून संप पुकारला होता. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सातारा येथील निवासस्थानी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, सरकारने थकित बिले चुकती करण्यासाठी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात केलेल्या १९ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीव्यतिरिक्त अतिरिक्त ९ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

# बिगर सिक्कीमी जोडप्यांच्या मुलांना
## राज्यात मालमत्तेचा अधिकार नाही

**सिक्कीम या राज्याला राज्यघटनेतील कलम ३७१ एफ अन्वये विशेष दर्जा प्राप्त आहे. त्यानुसार सिक्कीमबाहेरील पुरुषाशी लग्न करणाऱ्या सिक्कीमी महिलांच्या मुलांना राज्यात मालमत्तेचा अधिकार दिला जात नाही. या कायद्याला आव्हान देणारी शंभरहून अधिक महिलांनी संयुक्तपणे केलेली याचिका सिक्कीम उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.**

■ गंगटोक

**न्या. मिनाक्षी** मदान राय यांच्या एकल पीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी राज्य सरकारने सन २०१८ मध्ये लागू केलेल्या अधिसूचनेनुसार सिक्कीमच्या बाहेरील पुरुषाशी लग्न करणाऱ्या सिक्कीमी महिलांच्या मुलांनी आपल्या आईच्या माहेरच्या मालमत्तेमध्ये कायदेशीरपणे हिस्सा दिला जात नाही. म्हणजे आईच्या माहेरच्या लोकांची जरी इच्छा असली तरी राज्यात मालमत्ता तिच्या मुलांच्या नावे करता येत नाही. तसेच अशा मुलांना अधिकृत ओळखपत्र (सीओई) दिले जात नाही.

या अधिसूचनेला या महिलांनी आव्हान दिले होते.



तसेच आपल्या मुलांना ओळखपत्र दिले जावे आणि सरकारी नोकऱ्यांसाठी अर्ज करण्याची परवानगी दिली जावी, अशी मागणी केली होती.

# कर्मचारी-निवृत्तीवेतनधारकांना भत्त्याचे समान हक्क! सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

■ नवी दिल्ली

**कर्मचारी** आणि निवृत्तीवेतनधारकांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय देत सर्वोच्च न्यायालयाने महागाई भत्ता (डीए) आणि महागाई सवलत (डीआर) वाढवताना दोघांमध्ये भेदभाव करता येणार नाही, असे स्पष्ट केले. न्या. मनोज मिश्रा आणि प्रसन्न बी. वराळे यांच्या खंडपीठाने केरळ सरकार आणि केरळ राज्य रस्ते वाहतूक महामंडळ यांनी दाखल केलेले अपील फेटाळून लावत हा निर्णय दिला.

न्यायालयाने नमूद केले की, महागाईचा परिणाम सेवेत असलेले कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक या दोन्हींवर समान होतो. त्यामुळे डीए (सेवारत कर्मचाऱ्यांसाठी) आणि डीआर (निवृत्तीवेतनधारकांसाठी) यामध्ये वाढीचे वेगवेगळे दर ठेवणे



हे मनमानी आणि भेदभावपूर्ण ठरते. दोन्ही भत्त्यांचा उद्देश महागाईचा परिणाम कमी करणे हा आहे. त्यामुळे लाभ देताना दरांमध्ये तफावत ठेवण्याचा कोणताही तर्कसंगत आधार नाही. असे करणे हे

पान ७ वर



# पशुधन उद्योजकता योजनेत वराह पालनाचा समावेश

**राज्य सरकारचा निर्णय**

■ मुंबई

**राज्यातील** पशुपालन क्षेत्राला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने वराह (डुक्कर) पालनाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत आता वराह पालनाचा समावेश करण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केला आहे.

भाजपा आमदार गोपीचंद पडळकर आणि मंत्री नितेश राणे यांनी या योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत अखेर राज्य सरकारने ही योजना मंजूर केली आहे. ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती आणि पूरक उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

या योजनेअंतर्गत वराह खरेदीसाठी शासनाकडून ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के, तर अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान मिळणार आहे. तसेच, कुक्कुटपालन आणि मेंढीपालनाप्रमाणेच वराह पालनासाठीही ४ टक्के व्याजदरात कर्ज सवलत देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, भूमिहीन, अत्यल्प व अल्प भूधारक शेतकरी, वनहक्कधारक, सुशिक्षित बेरोजगार तसेच महिला बचत गटांना दिला जाणार आहे. मात्र, लाभार्थ्यांना पशुपालन व्यवसायाचे शासकीय किंवा निमशासकीय संस्थेकडून प्रशिक्षण घेणे आवश्यक राहणार आहे. अर्जाच्या वेळी प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास, अनुदान मिळण्यापूर्वी प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक असेल.

# रेल्वेच्या १.५३ लाख कोटींच्या तब्बल १०० प्रकल्पांना मंजुरी

■ मुंबई

**भारतीय** रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी १.५३ लाख कोटी रुपयांच्या खर्चाच्या १०० नवीन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक १७ प्रकल्पांचा समावेश आहे. या महत्त्वाकांक्षी योजनांमुळे ६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त नवीन रेल्वे जाळे तयार होणार असून, गर्दी कमी करण्यासाठी आणि प्रवासी सुविधा सुधारण्यासाठी नवीन मार्ग, दुहेरीकरण आणि बहु-ट्रॅकिंगची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

हे प्रकल्प संपूर्ण भारतात राबविले जाणार असून,

**महाराष्ट्रातील सर्वाधिक १७ प्रकल्पांचा समावेश**

त्यासाठी मालवाहतूक कॉरिडॉर, औद्योगिक जोडणी आणि प्रवासी मागणीचा विचार करण्यात आला आहे.

या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र (१७ प्रकल्प), बिहार (११), झारखंड (१०) आणि मध्य प्रदेश (९) ही प्रमुख राज्ये निवडली आहेत. ही राज्ये भारताच्या लॉजिस्टिक्स



नेटवर्कचा कणा आहेत. येथील वाढलेल्या जोडणीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला व्यापक फायदे होणार आहेत, अशी माहिती मंत्रालयाने दिली.

या प्रमुख प्रकल्पांमध्ये सुमारे १०,१५० कोटी रुपयांचा कसारा-मनमाड तिसरा आणि चौथा मार्ग (१३१ किमी), ८,७४० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा खरसिया-नया रायपूर-परमलकासा पाचवा आणि सहावा मार्ग (२७८ किमी), ५,४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा इटारसी-नागपूर चौथा मार्ग (२९७ किमी) आणि ५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा सिकंदराबाद (सनाथनगर)-वाडी तिसरा आणि चौथा मार्ग (१७३ किमी) यांचा समावेश आहे.

# पुण्यात ग्रामीण भागातील अंत्योदयधारकांनाच रॉकेल

■ पुणे

**युद्धजन्य** परिस्थितीमुळे स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शिधापत्रिकेवरून रॉकेल वितरणाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यासाठी २ लाख ४ हजार लीटर रॉकेलचा कोटा मंजूर करण्यात आला असून, तालुकानिहाय वाटप निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, उपलब्ध कोटा अत्यल्प असल्याने केवळ ग्रामीण भागातील अंत्योदय (गरजू) शिधापत्रिकाधारकांनाच रॉकेलचा लाभ दिला जाणार आहे. नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना या वितरणातून वगळण्यात आले आहे. तालुकानिहाय वाटपात बारामतीला सर्वाधिक ३३ हजार लीटर, तर इंदापूरला २७ हजार लीटर रॉकेलचा पुरवठा केला जाणार आहे. उर्वरित तालुक्यांनाही शिधापत्रिकांची संख्या लक्षात घेऊन कोटा देण्यात आला आहे.



महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या पार्थिवाचे त्यांच्या मुंबई येथील निवासस्थानी जाऊन दर्शन घेतले तसेच त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

# सुनेत्रा पवारांची पुणे महापालिका प्रशासनाविरुद्ध मुख्यमंत्र्यांना तक्रार

■ पुणे

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांनी पुणे महानगरपालिका प्रशासनाविरुद्ध गंभीर तक्रार केली असून, याबाबत त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे.

सुनेत्रा पवार यांनी आपल्या पत्रात महापालिकेकडून करण्यात आलेल्या क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेवर आक्षेप घेतला आहे. ही पुनर्रचना चुकीच्या पद्धतीने झाल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ संबंधित प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. पुणे महापालिकेकडून क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महापालिका निवडणुकीनंतर प्रशासनाकडून १५ क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या बदलांमुळे नागरिकांच्या सोयीऐवजी अडचणी वाढल्याचा मुद्दा सुनेत्रा पवार यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या प्रकरणी नगरविकास विभागाकडूनही चौकशी सुरू केली आहे. महापालिकेच्या कामकाजावर लक्ष ठेवले जात आहे. आता या अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे संकेत आहेत.

# संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीच्या मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर

■ आळंदी

**आळंदी** येथून निघणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यातील पुण्यातील मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर पडला आहे. आता २६ एप्रिल रोजी पंढरपूर येथे होणाऱ्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला जाणार आहे. त्यानंतर १ मे रोजी वारीची अधिकृत कार्यक्रमपत्रिका आणि पालखी मुक्कामाचे वेळापत्रक जाहीर करण्यात



येणार असल्याची माहिती आळंदी देवस्थानने दिली आहे.

यापूर्वी आज म्हणजे १३ एप्रिलला या संदर्भात निर्णय होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, पुणे येथील भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिराच्या मुक्कामासाठी आवश्यक सोयी -सुविधांबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. देवस्थानकडून स्पष्ट करण्यात आले की, ९ व १० जुलै रोजीच्या मुक्कामासाठी आवश्यक सुविधा आणि उपाययोजनांबाबत प्रशासन, लोकप्रतिनिधी व मंदिर विश्वस्तांना सूचना देण्यात आल्या होत्या.



# साताऱ्यात तर्कतीर्थांचे चिरंजीव वासुदेव जोशी यांचे निधन

■ सातारा

**तर्कतीर्थ** लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे कनिष्ठ चिरंजीव आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी सदस्य वासुदेव लक्ष्मणशास्त्री जोशी (८०) यांचे काल रात्री ८ वाजता वाई येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. मेंदूतील पक्षाघातामुळे (ब्रेन स्ट्रोक) त्यांना गुरुवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. आज सकाळी ९ वाजता वाई येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. वासुदेव जोशी यांनी त्यांचे ज्येष्ठ बंधू व प्रसिद्ध शास्त्रज्ञ कै. मधुकर लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे अमेरिकेत राहून काही काळ शिक्षण घेतले होते. त्यानंतर त्यांनी पुणे येथील किर्लोस्कर कंपनीच्या संगणकीय विभागात कनिष्ठ संशोधक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. तर्कतीर्थांचे मराठी विश्वकोशातील स्वीय सहायक राम कोल्हटकर यांच्या निधनानंतर वासुदेव जोशी यांची त्या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. २००४ मध्ये ते या सेवेतून निवृत्त झाले. केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे, तर त्यांनी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य म्हणूनही मोलाचे योगदान दिले होते.


# अभियांत्रिकी, फार्मसीसाठी यावर्षी दोनदा 'सीईटी' होणार

■ सोलापूर

**अभियांत्रिकी** व फार्मसी प्रवेशासाठी ११ एप्रिलपासून नोंदणीकृत विद्यार्थ्यांची सीईटी सुरू झाली आहे. दोन सत्रांत सकाळी ९ ते दुपारी १२ आणि दुपारी २ ते सायंकाळी ५ यावेळेत ऑनलाईन परीक्षा होत आहे. परंतु यंदा मे महिन्यातही 'सीईटी' देता येणार आहे. सोलापूरसह राज्यभरातील साडेसात लाख विद्यार्थ्यांनी फार्मसी व अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

ही सीईटी २६ एप्रिलपर्यंत चालणार आहे. 'सीईटी' मध्ये २०० गुणांच्या पेपरसाठी तीन तासांचा वेळ असतो. प्रत्येक सत्राचा पेपर वेगवेगळा असतो. त्यामुळे प्रत्येक बॅचच्या ज्या विद्यार्थ्यास सर्वाधिक गुण मिळतात त्यावरुन पर्सेंटाईल ठरते. सर्वाधिक पर्सेंटाईलवरुन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सामाजिक लोकशाहीचे प्रणेते डॉ. आंबेडकर

देशाला जागतिक दर्जाचे सर्वोत्तम संविधान देणाऱ्या बाबासाहेबांना लोकशाही मूल्ये म्हणजेच ती जीवनमूल्ये आहेत हे तीव्रपणे जाणवले होते. म्हणूनच घटना समितीच्या १७ नोव्हेंबर १९४९ च्या बैठकीत त्यांनी जो काही इशारा देऊन ठेवला होता. त्यात ते म्हणतात, 'राजकीय लोकशाहीला पायाभूत अशी सामाजिक लोकशाही असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तर स्वातंत्र्य, समता, बंधुता यांना जीवनमूल्ये म्हणून मान्यता देणारी ही जीवनपद्धती आहे. ही तीन तत्त्वे म्हणजे त्रिमूर्तींमधील अलग अलग घटक म्हणून बघितली जाऊ नयेत. तर ती तत्त्वे त्रिमूर्तीची एकात्मता सिद्ध करतात. म्हणूनच कोणत्याही एका तत्त्वापासून दुसऱ्या तत्त्वाचा विच्छेद म्हणजे लोकशाहीच्या प्रत्यक्ष हेतूचाच पराभव होय.' इतक्या स्पष्ट शब्दांमध्ये लोकशाही आणि एकूण सामाजिक एकतेचा पर्यायाने राष्ट्रीय एकतेचा इतका सखोल विचार बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. आज त्यांची जयंती साजरी करीत असताना एकूणच लोकशाही आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता या तीनही तत्त्वांचे वारंवार स्मरण करण्याची आवश्यकता आहे. तब्बल दोन अडीच वर्षे अथक परिश्रम करून बाबासाहेबांनी संविधान तयार केले. तो केवळ कायदे नियमांचा दस्तावेज नव्हता. तर भारताच्या भाग्योदयाचे सशक्त आश्वासन होते. त्यांनी वापरलेला सामाजिक लोकशाही हा शब्द अनेक दृष्टींनी अर्थपूर्ण ठरतो. केवळ राजकीय लोकशाही असून, देशाचे कल्याण होणार नाही. त्याच्यासोबत सामाजिक लोकशाहीचे संवर्धन करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. हे सांगण्यामागचा बाबासाहेबांचा उद्देश अतिशय स्पष्ट होता तो म्हणजे देशातल्या सामान्यातल्या सामान्य माणसाला खऱ्या अर्थाने जगण्याचा आणि स्वतःची उन्नती करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. हा अधिकार स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीनही गुणवैशिष्ट्यांच्या एकत्रित अंमलबजावणीतूनच मिळवू शकतो. आज संविधान निर्मितीच्या ७५ वर्षांनंतर किंवा स्वातंत्र्यप्राप्तीच्या ७७ वर्षांनंतरही समतेचे तत्त्व पूर्णपणे अस्तित्वात येऊ शकलेले नाही. राजकीय लोकशाहीने पोसलेली जातीय विषमता हे त्याचे उदाहरण आहे.

### दुर्लक्षित सामाजिक लोकशाही

गेल्या ७७ वर्षांमध्ये राजकीय लोकशाहीच अधिक प्रबळ होत गेली. सामाजिक लोकशाही दुर्लक्षित राहिली आहे. स्वातंत्र्य मिळाले आहे. परंतु समता आणि बंधुता पूर्णपणाने अस्तित्वात येऊ शकलेली नाही. जातीपातीच्या व्यवस्थेपासून ते स्त्री-पुरुष समानतेपर्यंत त्यातली विसंगती प्रकर्षाने लक्षात येते. अगदी संविधानाच्या प्रारूपाचे तिसऱ्यांदा जेव्हा वाचन झाले, त्याच्या चर्चेला उत्तर देतानासुद्धा बाबासाहेबांनी या विसंगतीवर बोट ठेवले होते. ते म्हणाले होते की, २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका फार मोठ्या विसंगतीने भरलेल्या जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकीयदृष्ट्या आपल्यात समता असेल, पण सामाजिक जीवनात मात्र विषमता असेल. राजकीय क्षेत्रात आपण 'एक व्यक्ती, एक मत' आणि 'एक मत आणि एक मूल्य' या तत्त्वाला मान्यता देणार आहोत. पण सामाजिक व आर्थिक जीवनात मात्र आपल्या विशिष्ट सामाजिक व आर्थिक रचनेमुळे आपण 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्त्व नाकारत आहोत. किती काळ आपण विसंगतीने भरलेले जीवन जगत राहणार आहोत? किती दिवस आपण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात समता नाकारत राहणार आहोत? आपण दीर्घकाळ ती नाकारत राहिलो तर आपल्याला आपली राजकीय लोकशाही धोक्यात येण्याची किंमत मोजावी लागेल. म्हणून शक्यतो लवकर आपण ही विसंगती काढून टाकली पाहिजे. बाबासाहेबांच्या या सूचनांची अधिक वेगाने आणि कृतीशील अंमलबजावणी करण्याची हीच वेळ आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे. रोजगाराच्या संधीही वाढत आहेत. परंतु ग्रामीण आणि शहरी यामध्ये दिसून येणारी विकासातली विषमता ही अनेकांना संधी नाकारताना दिसून येते. मिळालेले स्वातंत्र्य हे आर्थिक समानतेशिवाय परिपूर्ण ठरणार नाही. म्हणूनच समाजातल्या प्रत्येक घटकाला उत्पन्नाच्या किंवा जीवनाच्या उन्नतीसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक समानतेची संधी मिळाली पाहिजे. त्या दिशेने अधिक वेगाने प्रयत्न करण्याची गरज आहे. तरच ही विसंगती दूर होईल.

### हा बाबासाहेबांच्या विचारांचा विजय

आज भारताच्या लोकसंख्येमध्ये पहिल्यांदाच महिलांची संख्या सर्वाधिक झालेली आहे. पस्तीस टक्के तरुणांची संख्या आहे. या सर्वांना आर्थिक समानतेच्या संधींची प्रतीक्षा आहे. या संधी जशा रोजगारातून उपलब्ध होतील तशाच सामाजिक स्तरावर असलेल्या वेगवेगळ्या व्यवसायांच्या माध्यमातूनही प्राप्त करता येऊ शकतात. याचा अर्थ आर्थिक स्वातंत्र्य हे अजूनही पूर्णपणे अस्तित्वात येऊ शकलेले नाही. हा मूलभूत विचार मांडण्याची दूरदृष्टी बाबासाहेबांकडे होती म्हणूनच त्यांनी शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य दिले. हे सगळे विचार मांडून ते कृतीत उतरवण्याचा संविधानिक कर्मयोगच त्यांनी आचरून दाखवला. अतिशय हालअपेष्टा आणि विपरित परिस्थितीत त्यांनी संपादन केलेले शिक्षण आणि समाजातल्या तळागाळातल्या वर्गाला त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी सुरू केलेल्या चळवळी महत्त्वपूर्ण ठरतात. यंदाचे वर्ष हे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष आहे. २० मार्च १९२७ ला हा सत्याग्रह झाला आणि तो दिवस समता दिन म्हणूनही साजरा होत असतो. परंतु समाजातली गरिबी, निरक्षरता, दूर करून आर्थिक समानता प्राप्त झाल्याशिवाय या सामाजिक समतेलाही अर्थपूर्णता येणार नाही. बाबासाहेबांनी केलेले सत्याग्रह किंवा वेगवेगळ्या चळवळी आंदोलनं ही सामाजिक लोकशाही प्रस्थापनेचा पायाभूत निर्धार आणि संकल्प होता. भारतात खऱ्या अर्थाने त्यांनीच सामाजिक समतेची क्रांती सुरू केली. म्हणूनही ते क्रांतीसूर्य ठरतात. ७७ वर्षांनंतर का होईना परंतु महिलांना राजकारणामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याच्या कायद्याची अंमलबजावणी होत असेल तर तो बाबासाहेबांच्या विचाराचा विजय ठरतो आणि संविधानातल्या समानतेच्या तत्त्वाचाही सन्मान म्हणता येऊ शकतो. अशा या सामाजिक जीवनमूल्यांच्या आणि सामाजिक क्रांतीची प्रेरणा देणाऱ्या महामानवाला आमचे विनम्र अभिवादन आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

योग्यता तर कष्टानेच जन्माला येते. नाही तर प्रत्येक माणूस जन्मापासून शून्यच असतो.

**पंचांग**

**मंगळवार १४ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण द्वादशी**
*** नक्षत्र - शततारका**
**जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

रवी उदय- ०६-२४,
रवी अस्त- १८-५५

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, तिथीवासर सकाळी ६.५४ पर्यंत, सूर्य अश्विनी-मेष सकाळी ९.३१, पुण्यकाळ सूर्योदय ते दुपारी १.३१, पहाटे पूर्वेला शनी दर्शन, धोंडीराम महाराज यात्रा-पलूस मुक्ताबाई यात्रा-जुन्नर, अग्निशामक दल दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४


Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# पाककृती



## तांदळाच्या कुरडया

★**साहित्य : अर्धा किलो तांदूळ, चवीनुसार मीठ, गरजेनुसार पाणी, १ चमचा कुटलेले जिरे (ऐच्छिक)**



★**कृतीः-** तांदूळ तीन दिवस भिजत घालावेत. रोज रात्री तांदळाचे पाणी बदलावे. तिसऱ्या दिवशी तांदूळ उपसून घ्यावेत व कुटावेत किंवा मिक्सरमध्ये बारीक करावेत. मग दळलेले तांदूळ चाळणीतून चाळावेत. जेवढे पीठ होईल तेवढे पाणी उकळायला ठेवावे. पाणी चांगले उकळले की, त्यात मीठ घालावे व हळूहळू पीठ घालत जावे. पिठात गुठळ्या होऊ देऊ नयेत. अशाप्रकारे चीक तयार करावा. चीक गरम असतानाच कुरडया घालाव्यात व कडक उन्हात वाळवाव्यात.

## रव्याच्या कुरडया

★**साहित्य : अर्धा किलो रवा, चवीनुसार मीठ, १ चमचा हिंग.**

★**कृतीः-** रवा तीन दिवस पाण्यात भिजत घालावा. रोज रात्री रव्याचे पाणी बदलावे. तिसऱ्या दिवशी सकाळी रवा फडक्यातून गाळून घ्यावा. जेवढा रवा असेल तेवढे पाणी उकळायला ठेवावे व त्यात मीठ आणि हिंग घालावे. उकळत्या पाण्यात हळूहळू रवा घालावा व चांगले ढवळावे. गाठी होऊ देऊ नयेत. या मिश्रणावर झाकण ठेवून चांगली वाफ आणावी व गॅस बंद करावा. रव्याचा चीक गरम असतानाच सोऱ्यात घालून कुरडया पाडाव्यात व कडक उन्हात वाळवाव्यात.

# क्रीडा

# हैदराबादने राजस्थानचा ५७ धावांनी धुव्वा उडवला

## ईशानची ९१ धावांची खेळी! प्रफुल्लने ४ गडी टिपले

■ हैदराबाद



**ईशान** किशनची ९१ धावांची वादळी खेळी आणि वेगवान गोलंदाज प्रफुल्ल हिंगेने सुरुवातीलाच ४ गडी स्वस्तात बाद केल्यामुळे सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सवर ५७ धावांनी सनसनाटी विजय मिळवला. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या २१ व्या सामन्यात आज हैदराबादने ६ बाद २१६ धावा केल्या. या प्रत्युत्तरात राजस्थानला १९ षटकांत सर्वबाद १५९ धावांपर्यंत मजल मारता आल्याने आपल्या पाचव्या सामन्यात पहिला पराभव पत्करावा लागला. हैदराबाद संघाचा हा दुसरा विजय आहे.

राजस्थानने टॉस जिंकून हैदराबादला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले. जबरदस्त फॉर्ममध्ये असलेला अभिषेक शर्मा आर्चरच्या पहिल्याच चेंडूवर झेलबाद झाला. मग ट्रेविस हेडला रियान परागने माघारी धाडले. त्याने १८ चेंडूंत १८ धावा केल्या. त्यानंतर कर्णधार ईशान किशनने संघाचा डाव सांभाळून राजस्थानच्या गोलंदाजांना चांगलेच चोपून काढले. त्याने केवळ ३० चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. मग तो मोठा फटका मारण्याच्या नादात झेलबाद झाला. त्याने ४४ चेंडूंत ९१ धावा केल्या. परिणामी हैदराबादची धावसंख्या ३ बाद १४३ वर पोहोचली. त्यापाठोपाठ हेनरी क्लासेन देखील २६ चेंडूंत ४० धावा आणि नितीश कुमार रेड्डी १३ चेंडूंत २८ धावा करून बाद झाला. अनिकेत वर्मा ५ चेंडूंत ६ धावा करून बाद झाला. हर्ष दुबे एकही रन न करता नॉट आऊट राहिला. त्यामुळे हैदराबादने ६ बाद २१६ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना राजस्थानचा स्फोटक गोलंदाज वैभव सूर्यवंशीला गोलंदाज प्रफुल्लने पहिल्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर तंबूत धाडले. त्याला साधा भोपळाही फोडता आला नाही. मग याच षटकाच्या चौथ्या चेंडूवर ध्रुव जुरेलचा त्रिफळा उडाला. त्यानेही शून्य धाव केली. सहाव्या चेंडूवर प्रफुल्लने प्रिटोरियसलाही झेलबाद केले. प्रफुल्लने पहिल्याच षटकात राजस्थानचे महत्त्वाचे ३ गडी बाद केल्यामुळे हैदराबादच्या संघात उत्साहाचे वातावरण होते. मग सलामीवीर यशस्वी जयस्वालला वेगवान गोलंदाज साकिब हुसेनने १ धावेवर झेलबाद केले. कर्णधार रियान परागही प्रफुल्लचा शिकार बनला. तो फक्त ४ धावा करून माघारी परतल्याने राजस्थानची अवस्था ३ षटकांत ५ बाद ९ धावा अशी झाली होती. परिणामी हा सामना हैदराबादकडे झुकला.

रवींद्र जडेजा आणि डोनोव्हान फरेरा यांनी कसाबसा डाव सांभाळला. मात्र फरेराचा साकिब हुसेनने त्रिफळा उडवला. त्याने ४४ चेंडूंत ६९ धावा केल्या. जडेजा ४५ धावा करून यष्टीरक्षकाकडे झेलबाद झाला. त्यानंतर फलंदाजांना फारसी फटकेबाजी करता आली नाही. त्यामुळे राजस्थानला १९ षटकांत सर्वबाद १५९ धावांपर्यंत झेप घेता आली.

# चेन्नई आणि कोलकाता आज आमनेसामने

■ चेन्नई

**चेन्नईत** उद्या होणाऱ्या आयपीएलच्या २२ व्या सामन्यात पाच वेळचा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्स आणि कोलकाता नाईट रायडर्स आमनेसामने येणार आहेत. कोलकाताचा संघ विजयाचे खाते उघडण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. चेन्नईचा संघ विजयासह गुणतालिकेतील गुण वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी चेन्नईच्या संघाने मैदानावर कसून सराव केला. त्यासोबत चेन्नईचा सलामीवीर संजू सॅमसन आक्रमक फलंदाजी करून आपल्या संघाला विजयी करण्यासाठी आतुर आहे.

आतापर्यंत या दोन्ही संघांची कामगिरी अतिशय खराब राहिला आहे. दोन्ही संघ ४ सामने खेळणार आहेत. चेन्नई फक्त एकच सामना जिंकला आहे. त्यामुळे चेन्नईचा संघ गुणतालिकेत २ गुणांसह ९ व्या स्थानावर आहे. तर कोलकाताच्या संघाला एकाही सामन्यात विजय मिळवण्यात यश आले नाही. मात्र एक सामना पावसामुळे रद्द झाला. परिणामी कोलकाताचा संघ गुणतालिकेत १ गुणांसह अखेरच्या स्थानावर आहे. दोन्ही संघांत आतापर्यंत ३२ सामने खेळले गेले आहेत, ज्यात चेन्नईने २० आणि कोलकाताने ११ सामने जिंकले. तर एक सामना अनिर्णित राहिला. चेन्नईचा सलामीवीर संजू सॅमसनने दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध ५६ चेंडूंमध्ये ११५ धावांची नाबाद खेळी केली. त्यामुळे आता कोलकाताच्या गोलंदाजांना संजू सॅमसनपासून खूप सावध राहावे लागेल. चेन्नईच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी केली.

# वाशीत कॅरम स्पर्धेला सुरुवात
# मुंबईच्या संघांची विजयी सलामी

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने, महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि ठाणे जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने वाशीतील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे ६० व्या सीनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेला आज सकाळी ९ वाजता सांघिक गटांच्या सामन्यांनी सुरुवात झाली.

सांघिक पुरुष गटांच्या पहिल्या सामन्यात मुंबईने पालघरवर ३-०, पुण्याने रायगडवर ३-०, मुंबई उपनगरने धुळ्यावर २-१ आणि ठाण्याने कोल्हापूरवर ३-० असा विजय मिळवला. सांघिक महिला गटांच्या पहिल्या फेरीत मुंबईने रत्नागिरीचा ३-०, ठाण्याने पुण्याचा ३-०, मुंबई उपनगरने पालघरचा ३-० असा पराभव केला.

# सुशांत पालकर, प्रियेश पाठक, प्रणय पवार, गौरी कोरगावकर, साक्षी सरफरे विजेते

■ मुंबई

**को-ऑपरेटिव्ह** बँक एम्प्लॉईज युनियनतर्फे ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित आंतर को-ऑपरेटिव्ह बँक बुद्धिबळ स्पर्धेत ग्रेटर बँकेच्या सुशांत पालकरने एमएससी बँकेच्या आदित्य जोशीला शह देऊन विजेतेपद पटकावले. कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटात प्रियेश पाठकने आणि पुरुष दुहेरी गटात प्रियेश पाठक-प्रणय पवार या जोडीने महिला एकेरी गटात गौरी कोरगावकरने, महिला दुहेरी गटात गौरी कोपरगावकर-साक्षी सरफरे जोडीने अजिंक्यपदाला गवसणी घातली.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा युनियनचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री आनंदराव अडसूळ साहेब, युनियनचे कार्याध्यक्ष सुनिल साळवी, आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

# बालवीर स्पोर्ट्स क्लब आणि अंबिका सेवा मंडळ विजेते

**मुंबई** - अजित पवार यांच्या स्मरणार्थ हनुमान क्रीडा मंडळ, गौरीशंकर क्रीडा मंडळ आणि कुर्ला क्रीडा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कुर्ला येथील गांधी मैदानात आयोजित कुमार गट, प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे बालवीर स्पोर्ट्स क्लब आणि अंबिका सेवा मंडळाने जेतेपदाचा मान मिळवला. कुमार गटाच्या अंतिम फेरीच्या सामन्यात बालवीर स्पोर्ट्स क्लब यांनी जय भवानी क्रीडा मंडळाचा १४ गुणांनी सहज पराभव केला. बालवीर स्पोर्ट्स क्लबकडून साई भोसले यांनी उत्कृष्ट पकडी केल्या, तर रोहित सुनार यांनी चौफेर चढाया करत आपल्या संघाला विजयी केले. जय भवानीचे तुषार कांबळे, श्रवण गायकवाड छान खेळले. सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून रोहित सुनार यांना रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. प्रथम श्रेणी पुरुष गटात अंबिका मंडळाने वीर परशुराम क्रीडा मंडळाचा चुरशीच्या अंतिम लढतीत ९ गुणांनी पराभव केला. अंबिका सेवा मंडळाकडून शुभम दीडवाघ यांनी अष्टपैलू खेळ करत संघाला विजयी केले. या स्पर्धेसाठी शर्विल कदम या छोट्या खेळाडूने प्रत्येक पराभूत संघातील खेळाडूंना स्किपिंग रोपचे वाटप केले.

**वेदांता लिमिटेड**
सीआयएनः L13209MH1965PLC291394
१ला मजला, 'सी' विंग, युनिट १०३, कॉर्पोरेट ॲव्हेन्यू, अतुल प्रोजेक्ट्स, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, ४०००९३.

**भाग प्रमाणपत्र हरविल्याची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीद्वारे पारित खालील भाग प्रमाणपत्रे हरविल्याचे/गहाळ झाल्याचे किंवा चोरीला गेल्याचे कळविण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करण्याकरिता कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलियो क्र. | प्रमाणपत्र क्र. | डिस्टिंक्टिव्ह क्र. | समभाग | भागधारकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| Y001477 | ८१४३४५ | ३८२०६२४०१-३८२०६३२००<br>७७५६८२६०१-७७५६८३४०० | १६०० | यास्मिन के नौशेरवानजी |

जनतेस याद्वारे वरील भाग प्रमाणपत्रांची खरेदी किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करणे या विरोधात खबरदार करण्यात येत आहे. कोणी व्यक्ती ज्यांचा सदर भाग प्रमाणपत्रांच्या संदर्भात कोणताही दावा असल्यास, तो दावा कंपनीकडे त्यांच्या नोंद. कार्यालयामध्ये वर दिलेल्या पत्त्यावर सदर सूचना प्रसिद्धीच्या १५ दिवसांमध्ये दाखल करावा, ज्यानंतर असा कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करतील.
दिनांकः १४.०४.२०२६

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, महावीर नगर श्री स्वामी समर्थ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, महावीर नगर ओम साई को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड आणि महावीर नगर श्री गणेश कृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, सर्व लागू कायद्यांअंतर्गत योग्यरित्या नोंदणीकृत को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायट्या आणि त्यांच्या संबंधित मालमत्ता खाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केल्या आहेत (यापश्चात एकत्रितरित्या "संस्था" असे उल्लेखित) यांनी सहकारी अधिकारी, ग्रेड I, म्हाडा यांच्या उपस्थितीमध्ये दि. २६.१२.२०२३ रोजी बोलावण्यात आलेल्या संस्थांच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने, अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तांच्या पुनर्विकासाच्या संदर्भात ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर्स एलएलपी यांची कायदेशीर, वैधरित्या आणि निःसंदिग्धपणे अनन्य विकासक म्हणून नियुक्ती केली आहे.

पुढे असे सूचित करण्यात आले आहे की, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर्स एलएलपीची अनन्य विकासक म्हणून सदर नियुक्ती महावीर नगर श्री स्वामी समर्थ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड करिता जावक क्र. मुंबई/उप निबंधक/एसआरए/मुंबई पश्चिम उपनगर/५०६८/२०२३, महावीर नगर ओम साई को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड करिता जावक क्र. मुंबई/उप निबंधक/एसआरए/मुंबई पश्चिम उपनगर/५०६६/२०२३ आणि महावीर नगर श्री गणेश कृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड करिता जावक क्र. मुंबई/उप निबंधक/एसआरए/मुंबई पश्चिम उपनगर/५०६७/२०२३ धारण केलेल्या दिनांक २९.१२.२०२३ रोजीच्या आदेशानुसार म्हाडाच्या सहकारी निबंधक (मुंबई पश्चिम उपनगर) यांच्या कार्यालयाद्वारे योग्यरित्या नोंदणी/निर्देशित देखील करण्यात आले होते.

उपरोल्लेखित वैध आणि अस्तित्वात असलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने व तिच्या पूर्ततेसाठी, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर्स एलएलपीने प्रस्तावित पुनर्विकासाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण कृती, पावले आणि उपाययोजना हाती घेतल्या आहेत; तसेच या संबंधात त्यांनी लक्षणीय खर्च, शुल्क, व्यय, व्यावसायिक फी, वचनबद्धता, दायित्वे आणि जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. सदर नियुक्तीतून उद्भवणारे अधिकार आजही अस्तित्वात असून ते सर्वांवर बंधनकारक आहेत; आणि कोणत्याही व्यक्तीला या अधिकारांची उपेक्षा करण्याचा, त्यांना निष्प्रभ करण्याचा, त्यांचे महत्त्व कमी करण्याचा, त्यांना बाधा पोहोचवण्याचा किंवा त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही.

तमाम जनता, आणि विशेषतः सर्व विकासक, बिल्डर्स, गुंतवणूकदार, वित्तपुरवठादार, कंत्राटदार, एजंट, ब्रोकर्स, सल्लागार, प्रतिनिधी, नॉमिनीज, अभिहस्तांतरित व्यक्ती आणि त्यांच्यामार्फत किंवा त्यांच्या अधीन राहून हक्क सांगणाऱ्या इतर सर्व व्यक्तींना याद्वारे स्पष्टपणे आवाहन आणि सावध करण्यात येते की, त्यांनी परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या सोसायट्यांच्या मालमत्तेसंदर्भात, मग ती मालमत्ता पुनर्विकास, पुनर्विकासाचे हक्क, विकासाचे हक्क, मालकी हक्क, एफएसआय / टीडीआर लाभ, बांधकामाचे हक्क, विकासाची क्षमता आणि/किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा हक्क, अधिकार, हितसंबंध, लाभ किंवा पात्रता यांशी संबंधित असो, कोणतीही चर्चा, संवाद, वाटाघाटी, प्रस्ताव, योजना, अटींचा मसुदा, ज्ञापन, व्यवस्था, सामंजस्य, वचनबद्धता, व्यवहार किंवा कोणत्याही स्वरूपाची उलाढाल स्वीकारू नये, विचारात घेऊ नये, सुरू करू नये, मागणी करू नये, पाठपुरावा करू नये किंवा अंतिम करू नये.

याद्वारे विशेषतः सूचित आणि घोषित करण्यात येत आहे की, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीचे अधिकार अस्तित्वात असताना, सोसायट्यांद्वारे आणि/किंवा कोणत्याही पदाधिकाऱ्यांद्वारे, समिती सदस्यांद्वारे, सदस्यांद्वारे, सोसायट्यांमार्फत हक्क सांगणाऱ्या व्यक्तींद्वारे, किंवा सोसायट्यांसाठी किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीद्वारे, इतर कोणत्याही विकासक, विकास व्यवस्थापक, गुंतवणूकदार किंवा तृतीय पक्षाची कोणतीही कथित त्यानंतरची नियुक्ती/पुनर्नियुक्ती/समांतर नियुक्ती ही बेकायदेशीर, अनधिकृत, चुकीची, अप्रभावी, बंधनकारक नसलेली आणि ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीच्या विरोधात अंमलबजावणीयोग्य नाही असे ठरवून, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीद्वारे विवादित, विरोधित आणि आव्हानित केली जाईल.

तसेच, या सूचनेच्या प्रकाशनापूर्वी असो वा त्यानंतर, सोसायट्या आणि/किंवा त्यांचे कोणतेही सदस्य, पदाधिकारी किंवा प्रतिनिधी यांच्याशी करण्यात आलेल्या कोणत्याही चर्चा, पत्रव्यवहार, प्रस्ताव, देयक, दस्तऐवज, व्यवस्था किंवा व्यवहार यांच्या आधारे, कोणतीही त्रयस्थ व्यक्ती कोणत्याही प्रकारचा हिस्सा, अग्रक्रम, संरक्षण, एस्टोपेल, धारणाधिकार, प्रभार, बोजा, हितसंबंध, हक्क किंवा इतर कोणताही अधिकार सांगणार नाही; विशेषतः जर सदर बाबी, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीच्या वैध नियुक्तीमुळे उद्भवणाऱ्या अधिकारांशी विसंगत, प्रतिकूल किंवा त्या अधिकारांना बाधा आणणाऱ्या असतील.

सदर सूचना देऊनही, जर कोणी व्यक्ती आणि/किंवा एन्टिटीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्याः
- कोणताही ऑफर किंवा प्रस्ताव सादर केल्यास,
- कोणत्याही बोली किंवा स्पर्धात्मक प्रक्रियेमध्ये सहभागी झाल्यास,
- कोणत्याही चर्चा किंवा बोलणीमध्ये सहभागी झाल्यास,
- कोणतेही हेतू पत्र, नियुक्ती, परवानी, अधिकार किंवा हक्क प्राप्त केल्यास किंवा प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्यास,
- कोणताही तृतीय पक्ष अधिकार, इक्विटीज किंवा हितसंबंध निर्माण केल्यास किंवा करण्याचा प्रयत्न केल्यास,
- सोसायट्यांना किंवा त्यांच्या कोणत्याही सदस्यांना ट्रिनिटी प्राइम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपी यांच्या नियुक्तीची समाप्ती, पुनर्विचार, बदल, सौम्यीकरण, रद्दीकरण करण्यास किंवा नियुक्तीचे उल्लंघन करणारी कृती करण्यास प्रवृत्त केल्यास किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केल्यास,
- पुनर्विकासाच्या संबंधात संस्था आणि/किंवा त्यांच्या मालमत्तेशी कोणत्याही प्रकारे व्यवहार केल्यास,

त्यांनी तसे ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीच्या आधीपासूनच्या आणि सध्या अस्तित्वात असलेल्या हक्कांची पूर्ण जाणीव ठेवून आणि सर्व संबंधित व्यक्तींविरुद्ध उचित दिवाणी, गुन्हेगारी, करारात्मक, मनाई आदेशात्मक आणि/किंवा इतर प्रक्रियांचा अवलंब करण्याच्या हक्क आणि उपायांच्या अधिकारांना कोणतीही बाधा न आणता, संपूर्णपणे त्यांच्या स्वतःच्या जोखीम, खर्च आणि परिणामांवर करावे.

अशा सर्व व्यक्ती आणि संस्थांना याद्वारे पुढे अशी सूचना देण्यात येत आहे की, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीच्या अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या किंवा त्यामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या संस्था आणि/किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षाविरुद्ध, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीला योग्य ते दिलासा मागण्याचा अधिकार असेल. या दिलाशामध्ये, केवळ यापुरतेच मर्यादित न राहता, मनाई हुकूम, विशिष्ट कामगिरीची अंमलबजावणी, नुकसानभरपाई, मोबदला, कायदेशीर खर्च आणि कायदा व न्यायतत्त्वानुसार उपलब्ध असलेली इतर सर्व प्रकारचा दिलासा मिळण्याचा समावेश असेल.

ही सूचना या उद्देशाने पारित करण्यात आली आहे की, यापुढे कोणत्याही वेळी कोणत्याही त्रयस्थ पक्षाने अशी कोणतीही भूमिका घेऊ नये की, त्यांनी ही कृती कोणत्याही पूर्वसूचनेविना अथवा सद्भावनेने केली होती; तसेच, याद्वारे असे मानले जाईल की, सर्व संबंधित व्यक्तींना याची पूर्णपणे सूचना देण्यात आली आहे की, ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपीच्या अधिकारांच्या विसंगत असलेला कोणताही व्यवहार, सदर अधिकारांच्या अधीन असेल आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांना तो व्यवहार बांधील असेल.

**अनुसूची**

१. महावीर नगर श्री स्वामी समर्थ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, मालमत्तेचा पत्ताः सीटीएस क्र. १२८(भाग), गाव कांदिवली, एम.एच.बी. कॉलनी, एकता नगर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली पश्चिम मेट्रो स्टेशनजवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७.
२. महावीर नगर ओम साई को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, मालमत्तेचा पत्ताः सीटीएस क्र. १२८(भाग), गाव कांदिवली, एम.एच.बी. कॉलनी, एकता नगर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली पश्चिम मेट्रो स्टेशनजवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७.
३. महावीर नगर श्री गणेश कृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, मालमत्तेचा पत्ताः सीटीएस क्र. १२८(भाग), गाव कांदिवली, एम.एच.बी. कॉलनी, एकता नगर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली पश्चिम मेट्रो स्टेशनजवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७.

दिनांकः १४ एप्रिल, २०२६
ठिकाणः मुंबई

**ट्रिनिटी प्राईम प्रॉपर्टी व्हेंचर एलएलपी**
बी-१०१, राज राजफ्लॉवर, रॉयल कॉम्प्लेक्स, एक्सर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई - ४०००९२.

देश विदेश

# माझगाव डॉकने कोलंबो डॉकमध्ये ५१ टक्के हिस्सा विकत घेतला

■ नवी दिल्ली

**युद्धनौकांची** बांधणी करणारी भारत सरकारची माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (माझगाव डॉक) पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्तरावर एखाद्या कंपनीवर ताबा मिळवला आहे. माझगाव डॉकने श्रीलंकेच्या कोलंबो डॉकयार्ड लिमिटेड या कंपनीत ५१ टक्के हिस्सा विकत घेत कंपनीवर नियंत्रण मिळवले आहे.

## २४९.५ कोटींचा व्यवहार

हा व्यवहार २४९.५ कोटी रुपयांचा आहे.

माझगाव डॉकच्या वतीने शेअर बाजाराला ही माहिती देण्यात आली आहे. भारत सरकारच्या सागरी क्षेत्रावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या धोरणाला अनुसरून करण्यात आलेला हा व्यवहार देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कोलंबो शिपयार्ड ही श्रीलंकेची युद्धनौकांची बांधणी करणारी सर्वात मोठी कंपनी आहे.

भारतीय सागरी हद्दीत चीन आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे चीनला शह देण्याच्या दृष्ट्यादेखील हा व्यवहार महत्वाचा आहे.

कोलंबो शिपयार्ड ही कंपनी कोलंबो शेअर बाजारात नोंदणीकृत असलेली दिग्गज कंपनी आहे. कंपनीचे आशिया, पश्चिम आशिया आणि आफ्रिकेमध्ये सरकारी आणि खासगी क्षेत्रातील कंपन्या ग्राहक आहेत. माझगाव डॉकच्या २४९.५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे कोलंबो डॉकला आतापर्यंतचे सर्वात मोठे जहाज बांधणीचे कंत्राट मिळवता आले आहे. सुमारे १५० दशलक्ष डॉलरचे हे कंत्राट आहे.

# अमेरिकेत स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याचे प्रथमच अनावरण

■ सिएटल



**अमेरिकेत** सिएटल येथील अत्यंत व्यस्त वेस्टलेक चौकामध्ये स्वामी विवेकानंदांचा प्रथमच पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. सिएटलचे महापौर कॅटी विल्सन आणि सिएटलमधील भारतीय वाणिज्य दूतावासाचे महावाणिज्य दूत प्रकाश गुप्त यांनी संयुक्तपणे या पुतळ्याचे अनावरण केले. भारतीय मूर्तीकार नरेश कुमार कुमावत यांनी हा पुतळा घडवला.

या अनावरणाच्या समारंभाला ग्रेटर सिएटल भागातील स्थानिक महापौर, समुदायांचे प्रतिनिधी आणि अमेरिकेतील भारतीय समुदायाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. विल्सन यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्यामुळे सिएटलचे सर्वसमावेशक चैतन्य दिसून येते आणि भारत आणि अमेरिकेतील सांस्कृतिक संबंध अधिक बळकट झाले आहेत. नरेश कुमार कुमावत यांनी पोस्टमध्ये म्हटले की, स्वामी विवेकानंदांचे स्मारक शहराच्या मध्यवस्तीत उभे करणारे सिएटल हे अमेरिकेतील पहिले शहर ठरले आहे.

# श्रीलंकन नौदलाने घेतले भारताचे १२ मच्छीमार ताब्यात

■ कोलंबो

**सागरी** हद्दीत मासेमारी केल्याच्या आरोपाखाली श्रीलंकेच्या नौदलाने १२ भारतीय मच्छिमारांना अटक केली. त्यासोबत या कारवाईत त्यांची एक नौकाही जप्त केली. या कारवाईची माहिती श्रीलंकेच्या नौदलाने अधिकृत निवेदन प्रसिद्ध करुन दिली. या निवेदनात श्रीलंकेच्या नौदलाने म्हटले की, ११ एप्रिलला रात्रीच्या वेळी राबवण्यात आलेल्या मोहिमेत जाफनामधील काराइनगर येथील कोविलम किनारपट्टीजवळ भारतीय मच्छीमार मासेमारी करत असताना त्यांना पकडण्यात आले. यावेळी त्यांची मासेमारीची नौकाही ताब्यात घेण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून भारतीय मच्छिमारांवरील कारवाईचे सत्र सुरू आहे. याआधी ८ एप्रिल रोजी श्रीलंकेच्या नौदलाने मन्नारच्या उत्तर समुद्र क्षेत्रातून १० भारतीय मच्छिमारांना अटक केली होती आणि त्यांची नौका जप्त केली होती.श्रीलंकेच्या हद्दीत बेकायदेशीरपणे मासेमारी केल्याचा ठपका या मच्छिमारांवर ठेवण्यात आला.

# उमर खालिदची सुप्रीम कोर्टात जामिनासाठी फेरविचार याचिका

■ नवी दिल्ली

**फेब्रवारी** २०२० मध्ये दिल्लीमध्ये उसळलेल्या दंगलींप्रकरणी अटकेत असलेला जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचा माजी विद्यार्थी उमर खालिद याने आपल्याला जामीन नाकारण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध फेरविचार याचिका दाखल केली आहे.

केंद्र सरकारच्या प्रस्तावित नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात दिल्लीमध्ये दंगली उसळल्या होत्या. या दंगलींमध्ये ५३ निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. शेकडो लोक जखमी झाले होते. या दंगली घडवून आणण्याच्या कटात सामील असल्याचा आरोप उमर खालिद आणि इतरांवर ठेवण्यात आला आहे.

खालिदला सप्टेंबर २०२० मध्ये अटक करण्यात आली. तेव्हापासून तो कारागृहात आहे. त्याच्यावर दिल्ली पोलिसांनी गुन्हेगारी स्वरुपाचे कारस्थान करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि बेकादेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्यातील (युएपीए) विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# शिरगावच्या श्रीदेवी लईराईची जत्रा २१ एप्रिलपासून सुरू

■ पणजी

**गोव्यातील** डिचोली तालुक्यातील शिरगाव येथील श्रीदेवी लईराईची प्रसिद्ध जत्रा यंदा २१ एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यानिमित्त



प्रशासनाने तयारी सुरू केली.

ही जत्रा आगीवर चालण्याच्या परंपरेसाठी ओळखली जाते. पाच दिवस चालणाऱ्या या जत्रेत हजारो 'धोंड' (भक्त) रात्रीच्या वेळी पेटलेल्या होमकुंडावर चालतात. या जत्रेच्या निमित्ताने मंदिर मार्गावरील खराब रस्त्यांच्या हॉटमिक्स डांबरीकरणाचा शुभारंभ आमदार शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. यंदा भाविकांसाठी स्वतंत्र रांगा, दिशादर्शक फलक आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यावर विशेष भर दिला जात आहे. ६ महिन्यांपासून नियोजनासाठी बैठकांचे सत्र सुरू असून कामाला प्रत्यक्ष गती मिळाली. जत्रेत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सुरक्षेसाठी परिसरात ८४ सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. पहिल्या दिवशी गावात मोक्याच्या ठिकाणी दुकाने लावण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# युगांडा लष्करप्रमुखांनी मागितली तुर्कस्तानकडून सर्वात सुंदर महिला

■ कंपाला

**पूर्व** आफ्रिकेतील एक लँडलॉक देश असलेल्या युगांडाचे लष्करप्रमुख मुहुजी काइनरुगाबा यांनी एक्सवर पोस्ट करून तुर्कस्तानकडून १ अब्ज डॉलर आणि सर्वात सुंदर महिलेला आपली पत्नी बनवण्याची मागणी केली. यासह त्यांनी इशारा दिला की, ही मागणी पूर्ण झाली नाहीतर ३० दिवसांच्या आत तुर्कस्तानसोबतचे राजनैतिक संबंध तोडू आणि तुर्की एअरलाइनवरही बंदी घालू, त्यासोबत दूतावासही बंद करू.

त्यांनी युगांडाच्या लोकांना तुर्कस्तानला जाणे टाळण्याचा सल्ला दिला आणि इस्त्रायलच्या समर्थनार्थ १ लाख सैनिक पाठवण्याची ऑफरही दिली. मात्र यावर तुर्कस्तान किंवा सोमालियाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही आणि हे विधान सरकारी धोरण आहे की, त्यांचे वैयक्तिक मत आहे,हे देखील स्पष्ट नाही. मुहूजी काइनरुगाबा १९९९ पासून युगांडाच्या सैन्यात आहेत. त्यांना राजकारणात त्यांच्या वडिलांचे वारसदार मानले जाते. काइनरुगाबा ५० वर्षांचे आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# मतदारसंघांची फेररचना मोदींच्या लहरीवर होऊ दिली जाणार नाही

■ मुंबई

**दिल्लीपासून** गल्लीपर्यंत फोडाफोडीचे राजकारण करणाऱ्या मोदी-शहांना

## संजय राऊत यांचा इशारा

स्वतःच्या मर्जीनुसार मतदारसंघांची फेररचना करायची आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत आमच्याशी चर्चा केल्याशिवाय आम्ही सरकारला मनमानीपणे फेररचना करू देणार नाही, असा इशारा उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज दिला.

मोदी व शहांना या देशात विरोधी पक्षच नको आहे. आपण जे करू ते खरे अशी त्यांची वृत्ती आहे. केंद्र सरकारने गेल्या दहा-बारा वर्षात जे जे निर्णय घेतले ते केवळ भाजपाच्या हिताचे होते. देशाच्या हिताशी भाजपाला काहीही देणेघेणे नाही. मतदारसंघांची फेररचना करण्याचा घाट त्याचसाठी घातला जात आहे. निवडणूक आयोग मोदींच्या ताटाखालचे मांजर झाला आहे. आयोगाच्या मदतीने आपल्या मनाला वाटेल तशी मोडतोड करायचा मोदी-शहांचा प्रयत्न आहे. काहीही झाले तरी विरोधक निवडून येऊच नये, अशा प्रकारे मतदारसंघाची फेररचना त्यांना करायची आहे.

# मच्छिमारांच्या सुविधांसाठी ६१.२४ कोटी

■ मुंबई-

**राज्य** मंत्रिमंडळाने सागरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाचा निर्णय घेत मच्छिमारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी एकूण ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे.

या निधीतून सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्यात येणार आहेत. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येणार आहे. सून, मच्छिमारांच्या दैनंदिन कामकाजात सुलभता येईल, तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत होईल. या निर्णयामुळे सागरी भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याबरोबरच मच्छिमारांना सुरक्षित आणि सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# मेफेड्रोन विक्री! अल्पवयीन ताब्यात

**कवठे येमाई** - अमली पदार्थांविरोधी मोहिमेत पुणे ग्रामीण पोलिसांनी मेफेड्रोन (एम.डी.) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेतले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने केली. शिरूर बायपास येथील बंद पडलेल्या नाना स्पॉट हॉटेल परिसरात एक बालक मेफेड्रोनची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

# केज तहसीलदार मृत्यू प्रकरण फोन, लॅपटॉप गायब! मित्र बेपत्ता

■ केज

**येथील** तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती मृत्यूभोवतीचे गूढ अधिक गडद होत असून या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले. मृत्यूनंतर त्यांचा मोबाईल फोन आणि डेटा असलेला लॅपटॉप गायब झाल्याने संशय अधिकच बळावला. अपघाताच्या दिवशी दिवसभर गिड्डे यांच्यासोबत असलेले ४ ते ५ मित्र सध्या बेपत्ता झाले. त्यांनी अद्याप पोलिसांसमोर हजेरी लावलेली नसल्याने आणि मौन बाळगल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. गिड्डे यांच्या कुटुंबियांनी या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी केली. हा केवळ अपघात आहे की घातपात, याचा छडा लावणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. अपघाताच्या वेळी नेमके काय घडले, याची माहिती सोबत असलेल्या मित्रांकडे असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# राज्याच्या आरोग्य प्रकल्पांना जपानचा आधार

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात मोठे निर्णय घेण्यात आले. राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या



निधीतून वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियमातही सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने केली जाणार आहे. या बदलांमुळे प्रशासनिक रचना अधिक सक्षम होऊन आरोग्य क्षेत्रातील कामकाजाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# एमपीएससी भरतीत बदल संवर्ग संख्या ५३ वरून १५३

**मुंबई** - राज्य शासन सेवेतील पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) माध्यमातून भरल्या जाणाऱ्या विविध सेवांच्या संवर्गांची संख्या ५३ वरून थेट १५३ पर्यंत वाढविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी संधींचे दरवाजे मोठ्या प्रमाणावर खुले होणार आहेत. विकसित महाराष्ट्र २०४७ या व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा कृती आराखडा तयार केला असून, भरती प्रक्रियेत पारदर्शकता, गती आणि सुलभता आणण्यावर भर देण्यात येणार आहे. या बदलानुसार एमपीएससीमार्फत घेण्यात येणाऱ्या संयुक्त परीक्षा योजनेत काही नव्या सेवांचा समावेश करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्रात उष्णतेची लाट तीव्र अनेक जिल्ह्यांत तापमान ४० अंशांवर

■ मुंबई

**राज्यात** उष्णतेची लाट अधिक तीव्र होत असून, अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. पुणे शहरात उकाड्याचा तीव्र फटका बसत असून, गेल्या दोन दिवसांत तापमानात सातत्याने वाढ झाली आहे. आज पुण्यात कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअसपर्यंत नोंदवण्यात आले, तर पुढील दोन दिवसांत तापमान ४२ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई
(सक्षम प्राधिकारी- १) यांचे कार्यालय
एच.डी.आय.एल टॉवर ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१
संकेतस्थळ : www.sra.gov.in ईमेलः compauth1@sra.gov.in

क्र. सप्रा-१/टे-१-प्र/कावि-७९४/२६ दिनांकः १३/०४/२०२६

जाहिर नोटीस

श्री. रमेश मनी नायडू ...अर्जदार
विरुध्द
श्री. नायर कंदास्वामी अप्पू ... प्रतिवादी

प्रति,
श्री. नायर कंदास्वामी अप्पू
निर्मल नगर सह. गृह.संस्था,
वडाळा, मुंबई-३७

सदर जाहिर नोटीसव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, अपिलार्थी श्री. रमेश मनी नायडू यांनी गृहनिर्माण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२,०१ ऑक्टोबर, २०२४ नुसार दि.०१/०१/२०११ पूर्वी निर्गमित परिशिष्ट-II मधील हस्तांतरीत झोपडीधारकानी हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी करावयाचा अर्ज (अभय योजना) मधील जोडपत्र-एक नुसार मा. सक्षम प्राधिकारी-१ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एच.डी.आय.एल. टॉवर, ३ रा मजला अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ येथे निर्मल नगर सह. गृह. संस्थेचे मुळ परिशिष्ट-II अ.क्र.७८ वर आपले नावाऐवजी अर्जदार यांचे नाव पात्रतेकामी जोडपत्र दाखल केले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयात उक्त प्रकरणी दि. २५/०४/२०२५, रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती. सदर सुनावणीस आपण गैरहजर असल्याने मा. सक्षम प्राधिकारी-१ यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसव्दारे अवगत करणेच निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी असून सदर जाहिर नोटीसीव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित सुनावणी दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता मा.सक्षम प्राधिकारी-१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, यांचे दालनात उपस्थित/हजर राहून, आपली बाजू मांडावी, उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सही/-
(प्रफुल्ल पाटील)
सहा. महसूल अधिकारी
सक्षम प्राधिकारी-१
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

निविदा सूचना

सनरेज शॉपिंग सेंटर प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित
(पत्ता: सर्वे क्र. 149, सीएसटी क्र. 1, C-1/151, चारकोप मार्केट, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067) यांच्या इमारतीत (भूतळ, पहिला मजला व दुसरा मजला)
एअर कंडिशनिंग सिस्टीम (VRV व डक्टेबल AC)पुरवठा, बसविणे, चाचणी व कार्यान्वयन करण्यासाठी अनुभवी व पात्र कंत्राटदार/पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.
निविदा तपशील:
• निविदा कागदपत्र शुल्क: ₹1,500/-
• निविदा कागदपत्र मिळण्याची अंतिम तारीख: 20/04/2026 पर्यंत
• कार्यालयीन वेळ: सोमवार ते शनिवार सकाळी 11:00 ते 02:00 व संध्याकाळी 04:00 ते 06:00
• सीलबंद निविदा सादर करण्याची अंतिम तारीख:30/04/2026 पर्यंत
इच्छुक कंत्राटदार/पुरवठादार यांनी वरील वेळेत सोसायटी कार्यालयातून निविदा कागदपत्र प्राप्त करून स्थळ पाहणी (Site Inspection) करावी.
अधिक माहितीसाठी संपर्क:
सोसायटी मॅनेजर – श्री. ठोसर
मोबाईल: 7303823229
महत्वाची सूचना:
निविदा सादर करणाऱ्या व्यक्ति / संस्थेने सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांशी किंवा समिती सदस्यांशी कोणतेही वैयक्तिक किंवा व्यावसायिक संबंध असल्यास त्याची स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे.
सोसायटीला कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकृत किंवा नामंजूर करण्याचा पूर्ण अधिकार राहील.
— सोसायटी व्यवस्थापनाच्या आदेशाने

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
E-TENDER NOTICE
MSETCL SRM invites online RFx (Ex. e-Tender) from the Registered Contractors for MAHA TRANSCO e-Tendering (SRM) website for below mentioned work.
E-tender No. / RFx No. 7000039564. Name of work: "SAS Upgradation and Restoration of existing Protection & SCADA System at 132/33 kV Jawhar S/s" Estimated Cost: Rs.1,76,34,719/- with Tender Fees: Rs. 5000/- + GST.
Date for Sale and Submission of the e-Tender Documents: From 15.04.2026 @ 11.00 Hrs to 30.04.2026 @ 11.00 Hrs. For detailed information visit our website: https://srmetender.mahatransco.in.
Sd/-
Superintending Engineer, Protection, Automation and Communication Circle, Vashi

उरावी डिफेन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेड
(पूर्वीची उरावी टी अ‍ॅण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएन : L84220MH2004PLC145760
पत्ताः दुकान क्र. ३२९, एव्हिओर, निर्मल गॅलेक्सी, एल. बी. एस. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०, भारत
दूरध्वनी क्र. : +९१ २२ २५६५ १३५५, ई-मेल आयडी : info@uravilamps.com, वेबसाईटः www.uravilamps.com

डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा अहवाल

(रु.लाखात, ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | एकत्रित संपलेली तिमाही डिसेंबर २०२५ | एकत्रित संपलेली नऊमाही डिसेंबर २०२५ | एकत्रित संपलेली तिमाही डिसेंबर २०२४ |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न | १,०४८.४८ | २,९४६.६० | १,०३८.७४ |
| २ | कालावधीसाठी नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबपूर्व) | ९.२९ | ८८.३४ | ३६.३३ |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबनंतर) | ९.२९ | ८८.३४ | ३६.३३ |
| ४ | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा)(अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबनंतर) (एकत्रित आकडेवारीच्या बाबतीत, संबंधित रकमे मध्ये सहयोगी कंपनीच्या नफ्यातील हिस्सा समाविष्ट आहे.) | -०.८५ | ५२.७० | २७.५० |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वकष उत्पन्न (कालावधीकरिता समाविष्ट नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वकष उत्पन्न (करानंतर)) | १७.१४ | ६६.२५ | ७२.२५ |
| ६ | भरणा केलेले इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु.१०/- प्रति भाग) | १,१४० | १,१४० | १,१०० |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) | | | |
| ८ | उत्पन्न प्रति भाग (प्रत्येकी रु. १०/-) (खंडीत व अखंडीत कार्यचलनाकरिता) - | | | |
| | १. मूळ | -०.०५ | ०.४० | ०.६५ |
| | २. सौमिकृत | -०.०५ | ०.४० | ०.६३ |

टिपः
१. वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेल्या एकत्रित वित्तीय निष्कर्षांचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. निष्कर्षांचे संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर म्हणजेच www.bseindia.com आणि https://www.nseindia.com/ आणि कंपनीच्या www.uravilamps.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.
२. दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे, लेखापरीक्षण न केलेले एकत्रित वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षण समितीद्वारे तपासले गेले असून, दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी आयोजित बैठकीत संचालक मंडळाने त्यांना मंजुरी दिली आहे.
३. हे वित्तीय निष्कर्ष कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत निर्धारित भारतीय लेखा मानके (इंड एएस) तसेच कंपनी (भारतीय लेखा मानके) (दुरुस्ती) नियम, २०१८ यानुसार तयार करण्यात आले आहेत.
४. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे एकत्रित वत्तीय निष्कर्ष कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून मर्यादित परीक्षणास अधीन करण्यात आले आहेत.

उरावी डिफेन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी लिमिटेडच्या वतीने व करिता
(पूर्वीची उरावी टी अ‍ॅण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
सही/-
श्री. निरज गडा
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
डीआयएनः ००५१५९३२
दिनांकः ११ एप्रिल २०२६
ठिकाणः मुंबई
रामेश्वर मिडिया

जाहीर सूचना

सौ. नीरा वसंत पेडणेकर या रेनफॉरेस्ट रेसिडेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., कनाकिया रेनफॉरेस्ट, मरोळ पोलिस कॅम्प जवळ, मरोळ मरोशी रोडला लागून, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००५९ चे संयुक्त सभासद असून, सोसायटीतील 'ए' विंगमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.४०२ च्या संयुक्त मालक आहेत. सौ. नीरा वसंत पेडणेकर यांचे दिनांक २५.०४.२०२५ रोजी कोणतीही नामनिर्देशन न करता निधन झाले असून, श्री. वसंत सावळाराम पेडणेकर यांचे दिनांक १३.०१.१९९० रोजी निधन झाले आहे. त्यांचा मुलगा व एकमेव कायदेशीर वारसदार श्री. अमित वसंत पेडणेकर यांनी सदर फ्लॅटमधील १००% हिस्सा तसेच सोसायटीचे सभासदत्व त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी दावा करून अर्ज सादर केला आहे.
सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या दावा/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत.
वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल.
सही/-
मानद सचिव
रेनफॉरेस्ट रेसिडेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.
कनाकिया रेनफॉरेस्ट, मरोळ पोलीस कॅम्प जवळ, मरोळ-मरोशी रोडला लागून, मरोळ, अंधेरी (पू.), मुंबई ४०० ०५९
ठिकाण: मुंबई
दिनांक: १४.०४.२०२६

मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर, ४०१३०३
दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र.: वविशम/बांध/श.अ./१२/२६-२७
दि. : १३/०४/२०२६

जाहिर ई-निविदा सुचना

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खालील नमुद कामांकरीता कोरे निविदा फॉर्म https://Mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.१५/०४/२०२६ पासून उपलब्ध होणार आहेत. ई-टेंडरींग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए,बी,सी,डी, ई, एफ, जी.एच, आय कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी वगैरे कामे करणे कामी निविदेमध्ये सहभाग घेण्यात आलेल्या नोंदणीकृत ठेकेदारांची यांची पॅनलवर नियुक्ती करणे. (प्रथम टप्पा) | रु.२५.०० कोटी | ६ महिने |

Please Visit our official web-site (https://Mahatenders.gov.in)

सही/-
(प्रदीप पाचंगे)
प्र. शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका
जावक क्र. व.वि.श.म./मा.व.ज./१२६/२०२६

# चंदेरी च्वींगम

मुंबई | मंगळवार
१४ एप्रिल, २०२६
नवा काळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## डिपॉझिटविना अक्षयचा 'भाडेकरार'



बॉलिवूडचा खिलाडी अक्षय कुमारने अंधेरी पश्चिम येथील आपला आलिशान डुप्लेक्स फ्लॅट भाड्याने दिला असल्याची माहिती समोर आली आहे. मालमत्ता नोंदणीच्या आकडेवारीनुसार, अक्षयने हा फ्लॅट भारताची सर्वात तरुण महिला पायलट ॲनी दिव्या यांना भाड्याने दिला आहे. येथील 'स्काय पॅन' इमारतीमधील ११ व्या आणि १२ व्या मजल्यावर हा डुप्लेक्स फ्लॅट असून, त्यासोबत मोठी गच्चीदेखील आहे. या फ्लॅटसाठी दरमहा १ लाख ४४ हजार रुपये इतके भाडे ठरवण्यात आले आहे.

या व्यवहारातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुंबईतील भाडे बाजारात सुरक्षेसाठी 'डिपॉझिट' घेण्याची पद्धत असताना, अक्षयने या करारासाठी कोणतेही सिक्युरिटी डिपॉझिट घेतलेले नाही. तसेच भाड्यात वाढ करण्याची कोणतीही अट (एस्केलेशन क्लॉज) या करारामध्ये नमूद केलेली नाही. नोंदणी कागदपत्रांमध्ये अक्षय कुमारचे पूर्ण नाव 'अक्षय कुमार भाटिया' असे नमूद करण्यात आले आहे. या करारासाठी ९ हजार ७०० रुपये मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्युटी) आणि नोंदणी शुल्क भरण्यात आले आहे.

## 'ओटीटी'वर पर्वणी

या सप्ताहात ओटीटी प्लॅटफॉर्मवर मनोरंजनाची मोठी मेजवानी प्रेक्षकांसाठी सज्ज झाली आहे. नेटफ्लिक्स, प्राईम व्हिडिओ आणि जी-५ सारख्या माध्यमांवर वैविध्यपूर्ण विषयांवरील चित्रपट आणि वेब सीरिज प्रदर्शित होत असून, त्यात प्रामुख्याने 'अस्सी' आणि 'मटका किंग' यांसारख्या बहुप्रतिक्षित कलाकृतींचा समावेश आहे. घरबसल्या विरंगुळा शोधणाऱ्या प्रेक्षकांसाठी हा आठवडा पर्वणीच ठरणार आहे. राजकुमार राव आणि सान्या मल्होत्रा यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'टोस्टर' हा चित्रपट या महिन्यातील सर्वात चर्चेत असलेला विषय आहे. ही एक डार्क कॉमेडी स्वरूपाची कथा असून, लग्नात भेट मिळालेला आपला महागडा टोस्टर परत मिळवण्याच्या प्रयत्नात अडकलेल्या एका व्यक्तीची मजेशीर आणि गुन्हेगारी वळण घेणारी ही गोष्ट आहे. हा चित्रपट १५ एप्रिलपासून नेटफ्लिक्सवर उपलब्ध होणार आहे.

तापसी पन्नूची मुख्य भूमिका असलेला 'अस्सी' हा चित्रपट १७ एप्रिल रोजी जी-५ वर प्रदर्शित होत आहे. अनुभव सिन्हा यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात एका शालेय शिक्षिकेवर झालेल्या अत्याचारानंतरच्या न्यायाच्या लढाईचे चित्रण करण्यात आले आहे. तापसीने यात वकिलाची भूमिका साकारली असून, पुराव्यांच्या अभावी सुटणाऱ्या आरोपींना शिक्षा मिळवून देण्यासाठी कथेत येणारे नाट्यमय वळण प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे आहे.

ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवर १७ एप्रिलपासून 'मटका किंग' ही वेब सीरिज सुरू होत आहे. १९६० च्या दशकातील पार्श्वभूमी असलेल्या या गुन्हेगारी विश्वातील कथेत एका सामान्य कापूस व्यापाऱ्याचा 'मटका' हा जुगाराचा खेळ सुरू करण्यापासून ते अंडरवर्ल्ड आणि राजकारणातील बड्या पदापर्यंतचा प्रवास दाखवण्यात आला आहे. या व्यतिरिक्त 'दो दीवाने इस सहर में' हा रोमँटिक चित्रपट १७ एप्रिलपासून नेटफ्लिक्सवर येत आहे, ज्यात दोन व्यक्तींमधील न्यूनगंड आणि त्यांच्या प्रेमाची गोष्ट मांडली आहे. तसेच तरुणांमध्ये लोकप्रिय असलेली 'यूफोरिया' ही सीरिज तिसऱ्या सीझनसह १५ एप्रिलपासून जिओ हॉटस्टारवर उपलब्ध होणार असून, यात कथेला पाच वर्षांची उडी देण्यात आली आहे. कॉमेडी, क्राईम, थ्रिलर आणि रोमान्स अशा सर्व रसांचा अनुभव देणाऱ्या या यादीमुळे चाहत्यांचा विकेंड नक्कीच धमाकेदार जाणार आहे.




## 'छत्रपती' गीताचे प्रदर्शन लांबणीवर



जगप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे संपूर्ण देशावर शोककळा पसरली असून, त्यांच्या सन्मानार्थ अभिनेता रितेश देशमुखने आपल्या आगामी 'राजा शिवाजी' चित्रपटातील 'छत्रपती' या गीताचे प्रदर्शन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. १३ एप्रिल २०२६ रोजी हे गीत प्रदर्शित होणार होते. मात्र संगीत क्षेत्रातील या महान गायिकेला श्रद्धांजली वाहण्यासाठी निर्मात्यांनी हा सोहळा तूर्तास रद्द केला आहे. आशाजींच्या निधनामुळे आम्ही एका महान वारशाचा अस्त अनुभवत आहोत. त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी आम्ही 'छत्रपती' या गीताचा लाँच सोहळा पुढे ढकलत आहोत. या गीताची नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, असे यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे. हा चित्रपट १ मे २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

## दाऊदमुळेच माझी रोजीरोटी



नव्वदच्या दशकात बॉलिवूडवर अंडरवर्ल्डचे वर्चस्व असल्याची चर्चा नेहमीच होत असते. मात्र प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी या विषयावर अत्यंत धक्कादायक विधान केले आहे. गँगस्टर दाऊद इब्राहिममुळेच आपली रोजी-रोटी चालते, असे म्हणत त्यांनी दाऊदला एकप्रकारे आपला मसीहा मानले आहे. इतकेच नव्हे तर, त्यांनी आपली आत्मकथा दाऊद इब्राहिमला समर्पित (डेडिकेट) केली होती, असा खुलासाही त्यांनी केला आहे.

राम गोपाल वर्मा यांनी एका संवादादरम्यान सांगितले की, त्यांच्या 'गन्स अँड थाईज' या आत्मकथेचे समर्पण दाऊद इब्राहिमच्या नावाने होते. मात्र, प्रकाशकांनी नंतर त्याचे नाव तिथून हटवले. वर्मा यांच्या मते, जर दाऊद इब्राहिम नसता, तर 'सत्या' आणि 'कंपनी' यांसारख्या वास्तववादी अंडरवर्ल्डपटांची निर्मिती होऊ शकली नसती. मी माझे करिअर दाऊदमुळेच घडवले आहे. मग मी त्याला ही आत्मकथा समर्पित का करू नये? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. वर्मा यांच्या मते, या चित्रपटांमुळेच ते गुन्हेगारी विश्वाच्या जवळ गेले आणि त्या जगातील लोकांशी त्यांची मैत्री झाली, ज्यामुळे त्यांना कधीही त्रास झाला नाही. या विधानांमुळे बॉलीवूड आणि अंडरवर्ल्डमधील या जुन्या आणि वादग्रस्त संबंधांची पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे.


## करीना का ट्रोल होतेय?

मुंबई विमानतळावरील सुरक्षा तपासणीच्या रांगेत उभे न राहता थेट पुढे गेल्यामुळे अभिनेत्री करीना कपूर खान सध्या सोशल मीडियावर टीकेची धनी ठरली आहे. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नेटिझन्सनी कलाकारांना मिळणाऱ्या विशेष वागणुकीवर आणि त्यांच्या हक्काच्या भावनेवर (एन्टायटलमेंट) प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये करीना एका केशरी रंगाच्या पारंपरिक पोशाखात दिसत असून, ती रांगेत उभ्या असलेल्या इतर प्रवाशांना मागे टाकून थेट सुरक्षा गेटकडे जाताना दिसत आहे. यावरून सोशल मीडियावर टीकेचा महापूर आला आहे. एका युजरने संताप व्यक्त करताना म्हटले की, करीनाने विमानतळावर नियम मोडले आणि ती थेट गेटकडे गेली. कलाकारांना हा अधिकार कोणी दिला? रांगेत उभ्या असलेल्या इतर लोकांनाही महत्त्वाची विमाने पकडायची असतात, हे सर्वांसाठी अन्यायकारक आहे. दुसऱ्या एका युजरने या घटनेला 'व्हीआयपी संस्कृतीचा' नमुना ठरवत म्हटले की, एका साध्या रांगेमुळे सुसंस्कृत समाज आणि गुलामगिरीच्या मानसिकतेतील फरक दिसून येत. काही नागरिकांनी तर नागरी विमानचालन मंत्रालय आणि गृह मंत्रालयाला टॅग करून विचारले आहे की, कोणत्या कायद्यांतर्गत या बॉलीवूड कलाकारांना अशा विशेष सवलती दिल्या जातात? या वादाच्या दरम्यान, करीना कपूर खान आपल्या कुटुंबासह वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील आयपीएल सामना पाहताना दिसली असून, तिने अद्याप या वादावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.



# कणकवलीच्या शिरवलमध्ये १६ एप्रिलला विठ्ठल मंदिराचा वर्धापन दिन सोहळा

■ कणकवली



**शिरवळ** येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात १९ व्या वर्धापन दिनानिमित्त १६ एप्रिलपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण, हरिनाम सप्ताह, भजने, पालखी सोहळा आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असण्याची शक्यता आहे. हा वर्धापन दिन सोहळा २३ एप्रिलपर्यंत चालणार आहे.

कणकवलीचे प्रांताधिकारी जगदीश कातकर यांच्या हस्ते या वर्धापनदिन सोहळ्याचे उद्घाटन होणार आहे. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा वारकरी संप्रदायातील वारकरी तसेच शिरवळ ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत. पारायण सोहळ्यात दररोज काकड आरती, महापूजा, महाप्रसाद, हरिपाठ, कीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत. २३ एप्रिल रोजी काल्याचे कीर्तन होऊन वर्धापनदिन सोहळ्याची सांगता होईल.

# एनसीईआरटीकडून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळला

**छत्रपती संभाजीराजेंचा संताप**

■ कोल्हापूर

**नॅशनल** कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एनसीईआरटी)ने इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शवणारा नकाशा हटवण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयावर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, शैक्षणिक व राजकीय वर्तुळातही यावरून वादंग निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीराजे यांनी एक्सवर पोस्ट करत संताप व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, एनसीईआरटीने कोणतेही ठोस कारण न देता पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा वगळला आहे. हा निर्णय मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासाची तसेच राष्ट्ररक्षणासाठी त्यांनी दिलेल्या बलिदानाची अवहेलना करणारा आहे. मराठ्यांचे प्रभुत्व देशाच्या विस्तृत भागावर होते. मराठा साम्राज्याचा इतिहास आणि राष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे योगदान भावी पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी हा नकाशा पुन्हा पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावा. यासंदर्भात केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना सविस्तर पत्रही पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

या बदलामुळे शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात मोठे वादळ निर्माण झाले असून, छत्रपती घराण्यासह शिवप्रेमी आणि इतिहासप्रेमींनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास पुसण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप करत सर्व स्तरांतून या निर्णयाचा तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे.

# रिक्षाचालकांना मराठीची सक्ती लॉरेन्स बिष्णोई टोळीकडून धमकी

■ भाईंदर

**परिवहन** विभागाने सर्व रिक्षाचालकांना मराठीची सक्ती केल्याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. कुख्यात गुंड लॉरेन्स बिष्णोई टोळीने उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यालाच फोनवरून धमकी दिली आहे. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास बंगलोर पोलिसांकडे वर्ग करण्यात येणार आहे. मिरा-भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून बोगस कागदपत्रांच्या आधारे रिक्षा परवाने दिले जात असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या. त्यामुळे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शहरातील सर्व रिक्षांचे परवाने तपासण्याचे तसेच रिक्षाचालकांना मराठी भाषा अनिवार्य केली होती. मराठी भाषिकांकडून त्याचे स्वागत होत असले तरी परप्रांतियांनी विरोध केला आहे. शहरातील रिक्षाचालकांनी मराठी सक्तीच्या विरोधात बंददेखील पुकारला. दरम्यान, या वादात बिष्णोई याने उडी घेतली आहे. मिरा रोड उपप्रादेशिक परिवहन विभागाचे निरीक्षक प्रसाद नलावडे कुख्यात अंडरवर्ल्ड गुंड लॉरेन्स बिष्णोई याच्या नावाने अज्ञात क्रमांकावरून धमकी देण्यात आली. रिक्षांचे परवाने चुकीच्या लोकांना देऊ नका अन्यथा गंभीर परिणाम होतील अशी धमकी दिली.

# पुण्यात दैवीशक्तीच्या नावाखाली भोंदूकडून महिलेचे ५ वर्षे शोषण

■ पुणे

**पुण्यात** दैवीशक्ती असल्याचे भासवून भोंदूबाबाने महिलेचे ५ वर्षे लैंगिक व आर्थिक शोषण केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणामुळे शहरात संताप व्यक्त होत आहे.

नाशिकमधील अशोक खरात आणि पुण्यातील ऋषिकेश वैद्य यांची भोंदूगिरीची प्रकरणे ताजी असतानाच ही घटना उघडकीस आली. औदुंबर मनोहर गडदे (४३) या भोंदूने अंगात दैवी शक्ती असल्याचा आव आणत ४२ वर्षीय महिलेवर ५ वर्षांपासून अत्याचार केल्याचा आरोप आहे. कौटुंबिक वाद सोडवण्याच्या नावाखाली त्याने महिलेची ५० लाख ५५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचेही समोर आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने स्वारगेट पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# जात जनगणना थंड बस्त्यात टाकण्याचा केंद्राचा प्रयत्न!

**काँग्रेसचा जाहीर आरोप**

■ नवी दिल्ली

**काँग्रेसने** जातनिहाय जनगणनेचे स्वागत केले असले तरी, केंद्र सरकार ही प्रक्रिया लांबवत असल्याचा आणि तिला थंड बस्त्यामध्ये टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, राहुल गांधींनी याला धोरण निश्चितीचा पाया मानले असून, ओबीसी आणि दलित समाजाच्या हक्कांसाठी ही जनगणना आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी आरोप केला आहे की, मोदी सरकार जातनिहाय जनगणना लांबवून तिला 'कोल्ड स्टोरेज'मध्ये टाकत आहे आणि महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करून देशाची दिशाभूल करत आहे. काँग्रेसने असा सवाल केला आहे की, सप्टेंबर २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जातनिहाय जनगणनेला विरोध करणारे सरकार आता कोणतीही स्पष्ट भूमिका का घेत नाही. राहुल गांधी यांनी स्पष्ट केले आहे की, केवळ संख्या मोजणे पुरेसे नाही, तर ओबीसी आणि दलितांची संपत्ती आणि नोकऱ्यांमधील भागीदारी समजून घेण्यासाठी ही जनगणना आवश्यक आहे. काँग्रेसची भूमिका आहे की, देशातील मागासवर्गीय आणि दलितांना त्यांचा न्याय्य वाटा मिळवून देण्यासाठी जातनिहाय जनगणना अनिवार्य आहे.

# सागरी सुरक्षा अधिक भक्कम पोलिसांना ३० नवीन स्पीड बोट



■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्याच्या सागरी सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. पोलीस दलात लवकरच ३० नवीन स्पीड बोटी दाखल होणार आहेत. त्यामुळे किनारपट्टीवरील गस्त अधिक सक्षम होणार आहे.

पहिल्या टप्प्यात २० सागरी गस्ती नौकांच्या खरेदीची प्रक्रिया सुरू झाली आहे. याशिवाय २१ डिग्री प्रकारच्या बोटी खरेदी करण्याचा प्रस्तावही पोलीस महासंचालकांनी सादर केला आहे. नवीन बोटींच्या मदतीने शून्य ते १२ नॉटिकल माईलपर्यंतच्या समुद्री भागात प्रभावी गस्त घालणे शक्य होणार आहे. महाराष्ट्राला सुमारे ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा आणि ८४२ किलोमीटरचा खाडी किनारा लाभलेला आहे. सध्या सागरी सुरक्षेसाठी पोलिसांकडे ५५ स्पीड बोटी उपलब्ध असून, त्या २००८ ते २०१२ या कालावधीत खरेदी करण्यात आल्या होत्या. आता नव्या तंत्रज्ञानाने सुसज्ज बोटींच्या समावेशामुळे गस्त अधिक वेगवान आणि कार्यक्षम होणार आहे. नवीन स्पीड बोटींच्या पुरवठ्यासाठी तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. या बोटींच्या माध्यमातून सागरी भागात संशयास्पद हालचालींवर अधिक बारकाईने लक्ष ठेवता येणार आहे. तसेच भारतीय तटरक्षक दल यांच्या हालचालींवरही समन्वय साधत देखरेख ठेवली जाणार आहे. लवकरच या ३० स्पीड बोटी पोलिसांच्या ताफ्यात दाखल झाल्यानंतर राज्याची सागरी सुरक्षा अधिक भक्कम होणार आहे.

# अखेर मुरबाड-खोपोली रस्ता बाधितांना मोबदला मिळणार

**१८ वर्षांनंतर न्याय मिळणार**

■ कर्जत

**ठाणे** आणि रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या महामार्गासाठी जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना अखेर १८ वर्षांनंतर न्याय मिळणार आहे. या रस्त्यासाठी जमिनी सुमारे १४० शेतकऱ्यांना महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून मोबदला देण्याचा निर्णय घेतला आहे.

२०१७ मध्ये या महामार्गाचे दुपदरीकरण करण्यात आले होते. मात्र मोबदला न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध कायम राहिल्याने कामे रखडली होती. परिणामी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून प्रवास धोकादायक झाला होता. आता मोबदल्याचा प्रश्न मार्गी लागल्याने उर्वरित कामांना वेग येणार आहे. कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या या रस्त्याचे दुपदरीकरण करण्यात आले. मात्र त्यासाठी जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना दीर्घकाळ मोबदला मिळाला नव्हता. यामुळे शेतकऱ्यांनी अनेकवेळा आंदोलन करत वाहतूक रोखून धरली होती. या प्रश्नाची दखल घेत आमदार महेंद्र थोरवे यांनी पुढाकार घेत प्रांताधिकारी कार्यालयात महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीला तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, कर्जतचे पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड, खालापूर पोलीस अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी खालापूर तालुक्यातील हाल खुर्द तसेच कर्जत तालुक्यातील नावंढे, डोलवली, कर्जत तालुक्यातील तळवली, वर्णे आणि नांगुर्ले येथील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुंबई बँकेच्या ग्राहकांच्या समाधानाची जबाबदारी माझी

**बांद्रा शाखा उद्घाटनप्रसंगी अनिल परब यांचे प्रतिपादन**

■ मुंबई

**आ. प्रवीण** दरेकर आणि माझी मैत्री सर्वश्रुत आहे. या बँकेची जबाबदारी १०० टक्के माझी आहे. बँकेची सुरक्षा, बँकेत येणाऱ्या ग्राहकांचे समाधान याची जबाबदारी येथील मी रहिवाशी असल्याने माझी असल्याचे प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांनी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बांद्रा (पूर्व) शाखेच्या उद्घाटनप्रसंगी केले.

रामकृष्ण परमहंस मार्ग, गांधीनगर बांद्रा (पूर्व) येथील बँकेच्या शाखेचा उद्घाटन सोहळा आज अनिल परब आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे, नगरसेवक आणि संचालक प्रकाश दरेकर, संचालक विष्णू घुमरे, आनंदराव गोळे, संतोष दुवाळी, संचालिका शिल्पा सरपोतदार, जयश्री पांचाळ, तेजस्विनी घोसाळकर, कविता देशमुख, राज्य कंझ्युमर फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले, बँकेचे कार्यकारी संचालक डी. एस. कदम, मुख्य सरव्यवस्थापक संदीप सुर्वे यांसह बँकेचे कर्मचारी, सहकारातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या सोहळ्यात अनिल परब म्हणाले की, दरेकर यांचे योगदान मला माहीत आहे.



स्वयंपुनर्विकासाच्या बाबतीतही त्यांची धडपड मी पाहत आलो आहे. मुख्यमंत्र्यांची पूर्ण ताकद त्यांच्या पाठीशी आहे. मुंबई बँकेच्या माध्यमातून जे विस्ताराचे जाळे वेढलेले आहे ते ग्राहकांच्या समाधानाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. बँकेत येणारा माणूस हा अतिथी आहे आणि त्याचे समाधान होईल याची काळजी आपल्यासोबत मीही घेईन.

त्यावेळी दरेकर म्हणाले की, बांद्रा विभागात मराठी माणूस मोठ्या प्रमाणावर राहतो. त्यांना सोयीची होईल अशा प्रकारची मुंबई बँकेची शाखा येथे निर्माण होत आहे. मुंबई जिल्हा बँक अतिशय झपाट्याने दिवसेंदिवस वाढत आहे. १६ हजार ६०० कोटींचा टप्पा बँकेने पार केला आणि राज्यात अग्रणी बँक म्हणून नावलौकिकाला आली.

नवाकाळ

• मुंबई । मंगळवार १४ एप्रिल, २०२६ • पान -८

# रांजणगावचे महागणपती मंदिर ३ महिने बंद राहणार?



**शिरूर-** ज्योतिर्लिंग भीमाशंकरनंतर आता अष्टविनायकातील रांजणगाव महागणपती मंदिर तब्बल तीन महिने बंद ठेवण्यात येणार आहे. पुरातत्त्व विभागाकडून हे मंदिर बंद ठेवण्याचा प्रस्ताव ट्रस्टसमोर ठेवण्यात आला आहे. अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत रांजणगाव महागणपती मंदिर परिसरात विविध विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत. यात महागणपती मंदिरातील आवार, गाभारा आणि मंदिरासभोवतीची दगडी फरसबंदी, नगारखान्याचे काम करण्यात येणार आहेत. ही बांधकामे मंदिर सुरू ठेवून करता येणे अवघड आहे. तसेच ही कामे वेळेत पूर्ण करणे आणि पर्यटकांना आणि भाविकांना काही इजा होऊ नये, यासाठी मंदिर पूर्णपणे बंद ठेवून विभागाच्या ताब्यात देणे गरजेचे असल्याचे पत्रात पुरातत्त्व विभागाने म्हटले आहे.

**बहुतांश** आदिवासी फुलांना बाजारात लगेच विकून टाकतात. कारण, उन्हाळ्यात याशिवाय दुसरे पर्यायी उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे नाईलाजास्तव कमी भावात ही फुले विकावी लागतात.

वापरली जाते. मोहाची दारू नसली तर पूजा व विधी पूर्ण होत नाही. मोहाची दारू ही आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. या शिवाय गरोदर महिलांसाठी महुची फुले

हे तेल वापरले जाते.

मोठ्या मेहनतीने गोळा केलेल्या या मोहाच्या फुलांना मात्र बाजारभाव मिळत नाही. व्यापारी आदिवासींच्या आर्थिक कमकुवततेचा फायदा घेत अत्यंत स्वस्त भावात ही फुले विकत घेतात. शिवाय पावसाळ्यात ही फुले जतन करण्यासाठीची साधणे व

## आदिवासींच्या जीवनातील अविभाज्य भाग

# मोहाचे वृक्ष!

**होळीपासून महुच्या झाडांची पूर्णपणे पानगळ होऊन, मोहाची फुले येण्यास सुरुवात होते. धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यालगत सह्याद्री पर्वत रांगेत मोठ्या प्रमाणात महुची झाडे आहेत, तर शिरपूर तालुक्यात सातपुडा पर्वत परिसरातही मोहाची झाडे आहेत. नंदुरबार जिल्ह्यात तर मोठ्या प्रमाणात मोहाची झाडे आहेत. उन्हाळ्यात पहाटेपासून मोहाची फुले जमिनीवर पडतात. ही फुले गोळा करण्यासाठी सकाळी आदिवासी बांधव जंगलात व शेतात जातात, फुले वेचून ती सुकवण्यासाठी सारवलेल्या जमिनीवर टाकली जातात. सुकलेली फुले घरात साठवून ठेवली जातात किंवा लगेच बाजारात विकली जातात. मात्र लगेच बाजारात विकली तर फुलांना योग्य दर मिळत नाही.**





**संदीप विनायक देवरे**
यंग फाऊंडेशन, गुर्हाडपाणी

जागा उपलब्ध नसल्यामुळे ही फुले स्वस्तात विकण्याची वेळ आदिवासी बांधवांवर येते.

सरकारी पातळीवर मोहाची फुले खरेदी केंद्र सुरू व्हायला हवीत व ही फुले साठवून ठेवण्यासाठी संसाधनेही उपलब्ध करून द्यायला हवीत. अशी अनेक आदिवासी बांधवांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. सातपुड्यात मोहाच्या झाडांची संख्याही दिवसेंदिवस कमी होत आहे. या वृक्षांच्या लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचीही गरज आहे. महुच्या फुलांपासून विविध खाद्यपदार्थ बनवण्यासाठी आदिवासी भागात उद्योग सुरू करण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे. महुच्या संदर्भात स्वतंत्र धोरणच सरकारी पातळीवर होणे गरजेचे आहे. फक्त दारुसाठीच मोहाचा झाडाचा उपयोग आहे, असा नकारात्मक व एकांगी विचार मोहाच्या बाबतीत पसरवला गेलाय. त्यामुळे अत्यंत गुणवान व कल्पवृक्ष असणाऱ्या या झाडाला दुर्लक्षित करण्यात येतेय. मोहाच्या झाडाचे औषधी व सांस्कृतिक महत्त्व जतन करण्यासोबतच त्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. मोहाच्या झाडाचे जतन व संवर्धन करुया!!

मोहाच्या फुलांची दारू बनवतात हे सर्वांनाच माहीत आहे. परंतु याव्यतिरिक्तही या फुलांचे औषधी म्हणून बरेच उपयोग आहेत. मोहाची दारू ही थोड्या प्रमाणात घेतली तर औषधांसारखीच दमा, अस्थमा, खोकला या आजारांवर गुणकारी असते. महुच्या फुलांमध्ये जवळपास ७०% साखर व ३०% अल्कोहोल असते. त्यामुळे दारू बनवण्यासाठी हे उपयोगी ठरते.

आदिवासी भागातील प्रत्येक सण-उत्सवात मोहाची दारू वापरली जाते. शिवाय कोणतीही पुजाअर्चा, विधी करण्यासाठी मोहाची दारूच तिर्थ म्हणून

रात्री पाण्यात भिजवून सकाळी खाल्ल्यास गुणकारी ठरते. महुच्या फुलांचे पीठ बनवून लाडू, भाकरीत वापरले जाते. महुच्या फुलांमध्ये अनेक पोषणतत्वे असल्याने आदिवासी भागातील वैदु लोक वनऔषधी बनवण्यासाठी त्याचा वापर करतात.

महुच्या पानांचा, झाडाच्या सालीचाही औषधी म्हणून वापर केला जातो. महुच्या बियांचे तेल काढून ते आहारातही वापरले जाते. पूर्वीच्या काळी वीज नसायची तेव्हा आदिवासी पाड्यांत दिवा लावण्यासाठी या तेलाचा वापर जास्त प्रमाणात होत असे, आजही

# कोविड लसीमुळे जर्मनीत ६० हजार मृत्यू
## स्टर्झ यांच्या दाव्याला मस्क यांचा पाठिंबा



■ वॉशिंग्टन




**कोविड-**१९ महामारीच्या काळात एमआरएनए या लसीमुळे जर्मनीत सुमारे ६० हजार लोकांचा बळी गेला, असा दावा गेल्या आठवड्यात जर्मनीच्या संसदेत एका ज्येष्ठ वैज्ञानिकाने केला. अवघ्या पाच मिनिटांच्या या जबाबाची व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर कोट्यवधी लोकांनी पाहिली. त्यामुळे कोविड लसींच्या विश्वासार्हतेचा मुद्दा जगभर पुन्हा एकदा चर्चेत आला. त्यात अमेरिकेचे अब्जाधीश उद्योगपती एलॉन मस्क यांनी आपल्या अनुभवाची भर घालत वैज्ञानिकाच्या दाव्याला समर्थन दिले. कोविडचा दुसरा डोसने मला थेट रुग्णालयात नेऊन पोहोचवले. ही लस माझा जीव घेणार असे मला एका क्षणी वाटले होते, असे मस्क म्हणाले.

या वादळी चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. हेल्मुट स्टर्झ १९४६ साली जन्मलेले स्टर्झ हे फार्मास्युटिकल टॉक्सिकॉलॉजी या विषयातील तज्ज्ञ आहेत. औषध निर्मितीच्या क्षेत्रातील अमेरिकेची दिग्गज फायझर कंपनीत ते टॉक्सिकॉलॉजी विभागाचे प्रमुख होते. २००७ साली ते निवृत्त झाले. ते असा दावा करतात की, कोविड-१९ महामारीवर जर्मनी आणि जगात अन्यत्र देण्यात आलेल्या एमआरएनए या लसीमुळे हजारो लोकांचे बळी गेले. कारण या लसी सरकारने आवश्यक त्या चाचण्या न करताच मंजुरी दिली होती.

स्टर्झ यांच्या या दाव्यानंतर जर्मनीतील अति उजव्या विचारसरणीच्या एएफडी पार्टीने कोरोना महामारीच्या आणि त्यावर देण्यात आलेल्या लसींच्या परिणामांचा अभ्यास करणाऱ्या संसदीय समितीसमोर उभे केले. बुंडेस्टॅगमध्ये (जर्मनीची संसद) स्टर्झ यांनी आपला दावा पुन्हा एकदा मांडला. ती व्हिडिओ क्लिप काही लाख लोकांनी पाहिली.

# आ. फुकेंच्या भावजयीचा शरद पवार गटात प्रवेश

■ मुंबई

**कौटुंबिक** वादामुळे राज्यभर चर्चेत आलेले भाजपा आमदार परिणय फुके यांची भावजय प्रिया फुके यांनी आज शरद पवार गटात प्रवेश केला आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि माजी मंत्री अनिल देशमुख यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. नागपूर महापालिका निवडणुकीत अपक्ष म्हणून लढल्यानंतर त्यांनी आता शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्षात प्रवेश केला. त्यांना नागपूर शहर महिला अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

काही महिन्यांपूर्वी प्रिया फुके यांनी परिणय फुके आणि त्यांच्या कुटुंबियांवर मानसिक छळ व संपत्ती बळकावल्याचे गंभीर आरोप केले होते.

# अटक करण्याआधी ७२ तास नोटीस बजावणे बंधनकारक

■ मडगाव

**गुन्हा** नोंदवून अटकेची वेळ आल्यास त्यासाठी किमान ७२ तास आधी संबंधिताला पोलिसांनी नोटीस बजावणे बंधनकारक आहे, असे स्पष्ट करत मडगाव जिल्हा सत्र न्यायालयाने एका हॉटेलच्या व्यवस्थापकाला दिलासा दिला. काणकोण येथील हॉटेलच्या आर्थिक व्यवहार प्रकरणावरून अटकेची भीती असल्याने हॉटेल व्यवस्थापन सल्लागार निर्मल गांगुली यांनी मडगाव जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज सादर केला होता. न्यायाधीश शेरीन पॉल यांच्या न्यायालयात ही सुनावणी झाली. आपल्याला विनाकारण फौजदारी प्रकरणात अडकवले जात असल्याचा दावा निर्मल गांगुली यांनी केला होता. तर हॉटेल मालक कर्नल पवार यांच्या तक्रारीची चौकशी केली असता त्यामध्ये कोणताही दखलपात्र गुन्हा आढळलेला नाही. हे प्रकरण दिवाणी स्वरूपाचे असून, गांगुली यांच्याविरुद्ध सध्या कोणताही एफआयआर नोंदवला नसल्याचे न्यायालयात सांगितले. न्यायालयाने याप्रकरणी भविष्यात गुन्हा नोंदवून अटक करण्याची वेळ आल्यास निर्मल गांगुली यांना किमान ७२ तास आधी नोटीस बजावणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले.

# कल्याण-नगर महामार्गावर अपघात! ११ जणांचा मृत्यू

■ कल्याण

**कल्याण-नगर** महामार्गावर टिटवाळा जवळील रायता पुलावर आज सिमेंट मिक्सर ट्रक आणि काळी-पिवळी इको टॅक्सीची धडक झाली. या धडकेत ११ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक प्रवासी गंभीर जखमी झाला आहे.

टिटवाळा परिसरातील रायता पुलावर मिक्सर ट्रकने प्रवासी वाहतूक करणाऱ्या टॅक्सीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, टॅक्सीचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातावेळी टॅक्सीमध्ये १२ प्रवासी होते. त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, एक जण



जखमी अवस्थेत बचावला आहे. ही टॅक्सी मुरबाड येथून कल्याणकडे जात होती. दरम्यान, रायता पुलाजवळ हा अपघात झाला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. आवाज ऐकताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. चक्काचूर झालेल्या टॅक्सीतून मृतदेह बाहेर काढण्यासाठी स्थानिकांनी मोठी मदत केली. जखमी प्रवाशाला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. टिटवाळा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत अपघाताचा पंचनामा केला असून, अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भीषण अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. स्थानिक प्रशासनाशी संपर्कात असून मदतकार्य सुरू आहे.

# नायगावातील रस्त्याच्या भूमिपूजनावरून बविआ-भाजपात रंगली श्रेयवादाची लढाई

■ वसई

**नायगाव** येथील रस्त्याच्या कामाच्या भूमिपूजनावरून भाजपा आणि बहुजन विकास आघाडीमध्ये श्रेयवादाची लढाई रंगली आहे. रविवारी दोन्ही पक्षाने या कामाचे वेगवेगळे भूमिपूजन केल्याने राजकीय वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे.

वसईत तिन्ही आमदार भाजपा सेना महायुतीचे असले तरी पालिकेत सत्ता बहुजन विकास आघाडीची आहे. त्यामुळे विकासकामांचे श्रेय घेण्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये चढाओढ लागलेली असते. नायगाव पूर्वेच्या टीवरी फाटा ते भोयदापाडा या रस्त्याचे मजबुतीकरण पालिकेतर्फे करण्यात येत आहे. गेली अनेक वर्षे हा प्रश्न प्रलंबित होता. या रस्त्याचा विषय या भागासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे भाजपा आणि बविआ हे दोन्ही पक्ष या कामाचे श्रेय घेण्यासाठी पुढे आले. रविवारी भाजपा आणि बविआ या दोन्ही पक्षांनी या कामांच्या भूमिपूजनाचे स्वतंत्र कार्यक्रम आयोजित केले होते. सकाळी आमदार स्नेहा दुबे-पंडित, आमदार विलास तरे व भाजपाचे कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तर दुपारी बविआने महापौर अजीव पाटील यांच्या हस्ते भूमिपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला. विशेष म्हणजे बविआने बांधलेल्या मंडपातच भाजपाने भूमिपूजनाचा कार्यक्रम केला. हे काम आमच्यामुळेच झाले, असा दावा दोन्ही पक्षांनी यावेळी केला.

# रत्नागिरीतील आंबा व्यावसायिक रुपेश नागवेकर यांची आत्महत्या

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** जिल्ह्यातील प्रसिद्ध आंबा व्यावसायिक रुपेश नागवेकर यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. ही घटना रत्नागिरी तालुक्यातील ताणदे गावात घडली.

रुपेश नागवेकर यांनी त्यांच्या राहत्या घरी स्वतःच्या बंदुकीतून गोळी झाडून घेतली. गोळीबाराचा आवाज ऐकून कुटुंबीय आणि शेजारी तातडीने घटनास्थळी धावून आले असता, ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. त्यांना तत्काळ रुग्णालयात हलवण्यात आले, पण डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

रुपेश नागवेकर हे रत्नागिरीतील आंबा व्यवसायात एक यशस्वी आणि परिचित नाव म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनामुळे आंबा बागायतदार आणि व्यापारी वर्तुळात शोककळा पसरली आहे. गेल्या काही काळापासून ते आजारपणामुळे त्रस्त होते.

# गोकुळ गैरव्यवहाराची ईडीमार्फत चौकशी करा

■ कोल्हापूर

**'गोकुळ'** दूध संघातील कथित गैरव्यवहारावरून राजकीय वातावरण तापले असून, भाजपा आमदार शिवाजीराव पाटील यांनी गंभीर आरोप करत ईडीमार्फत चौकशीची मागणी केली आहे. त्यांच्या आरोपांमुळे मोठी खळबळ उडाली असून, एका मंत्र्याच्या आशीर्वादाने ३७०० नवीन दूध संस्थांची नोंदणी झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. पाटील यांनी आरोप केलेला मोठा मंत्री हे हसन मुश्रीफ आहेत का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

शिवाजीराव पाटील म्हणाले की, तत्कालीन विभागीय उपनिबंधक (दुग्ध) डॉ. महेश कदम यांनी एका मंत्र्याच्या सांगण्यावरून या संस्थांना मंजुरी दिली. या संपूर्ण प्रक्रियेची आणि इतर

**आ. शिवाजीराव पाटलांची मागणी**

कथित गैरव्यवहारांची चौकशी सक्तवसुली संचालनालयाकडून करण्यात यावी. तसेच हा मुद्दा विधानसभेच्या अधिवेशनात उपस्थित करणार आहे. प्रसंगी ईडीमार्फत चौकशी व्हावी, म्हणून मी उपोषणालादेखील बसणार आहे.

ते पुढे म्हणाले की, महायुतीची सत्ता आहे म्हणून भ्रष्टाचार सहन करायचा का? सामान्य दूध उत्पादकांच्या हितासाठी आम्ही लढत राहणार. गोकुळवर तातडीने प्रशासक नेमण्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, दूध संस्थांच्या नोंदणीबाबत आमदार पाटील यांचा गैरसमज झाला आहे. त्यांच्या भेटीनंतर हा गैरसमज दूर होईल. त्यांच्या पाठीमागे कोणीतरी चुकीची माहिती देत असल्याचे दिसते. त्यांचा बोलवता धनी कोण आहे?

# आशा भोसले यांच्या स्मरणार्थ मुंबईमध्ये संगीत अकॅडमी

■ मुंबई

**पद्मविभूषण** पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आशा भोसले यांनी गेल्या ऑक्टोबर महिन्यात मुंबईत आशा भोसले संगीत अकॅडमी सुरू करण्यासाठी राज्य सरकारकडे जागेची मागणी केली होती. त्यांची ही मागणी मान्य करून राज्य सरकारने म्हाडाच्या मुंबई मंडळाला जागेचा शोध घेण्याचे आदेश दिले होते.

म्हाडाच्या मुंबई मंडळाने वांद्रे-अंधेरीदरम्यान जागेचा शोध सुरू केला होता. आता या निर्णयानंतर आशा भोसले संगीत अकॅडमी सुरू करण्याच्या हालचालींना वेग येणार आहे. आशा भोसले यांनी राज्य सरकारकडे वांद्रे-अंधेरी दरम्यान हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. आता, आशा भोसले यांच्या नावाने स्मारक करायचे का? असा मुद्दा मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित केला होता.

# उमा भारतींसाठी झाशी स्टेशनवर पंजाब मेल थांबवली

■ झाशी

**मध्य प्रदेशच्या** माजी मुख्यमंत्री भाजपाच्या उमा भारती यांच्यासाठी झाशी रेल्वे स्थानकावर चेन ओढून पंजाब मेल थांबवली गेली. त्या प्लॅटफॉर्मवर पोहोचल्या तेव्हा नवी दिल्लीकडे जाणारी ट्रेन सुटू लागली होती. ट्रेन अर्धी प्लॅटफॉर्मवरून पुढे गेल्यानंतर समर्थकांनी चेन ओढली. उमा भारती यांना ए-१ डब्यात चढायचे होते. मात्र तोपर्यंत तो डबा पुढे सरकला होता. त्यामुळे त्यांनी बी-१ डब्यात प्रवेश केला. त्यांना ट्रेनमध्ये चढता यावे यासाठी चेन खेचल्याने ट्रेन सुमारे पाच



मिनिटे अर्धी प्लॅटफॉर्मवर आणि अर्धी यार्डमध्ये उभी होती. त्या ट्रेनमध्ये चढल्यानंतर गाडी पुढे रवाना झाली. उमा भारती यांच्यावर गुन्हा दाखल होणार का ही चर्चा आहे.

घटनेनंतर उमा भारती यांनी रेल्वे व्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, मी एक्सिलेटरने जात होते, पण अधिकाऱ्यांनी ई-कार्टने जाण्यास सांगितले. मात्र मार्गात अडथळे आल्याने उशीर झाला आणि ट्रेन सुटली. ही केवळ माझीच नव्हे, तर दररोज प्रवाशांना भेडसावणारी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

समस्या आहे. महिला, वृद्ध आणि दिव्यांगांना सर्वाधिक त्रास होतो. या प्रकरणी त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सोशल मीडियावर पत्र लिहून तक्रारही केली आहे.

# दिल्ली विधानसभा बॉम्बने उडवण्याची पुन्हा धमकी

■ नवी दिल्ली

**दिल्ली** विधानसभेला आज पुन्हा एकदा बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली. ४ दिवसांत दिल्ली विधानसभेला एकदा बॉम्बने उडवून देण्याची दुसऱ्यांदा धमकी मिळाली आहे. या घटनेनंतर सुरक्षा यंत्रणा तत्काळ सतर्क झाल्या. सकाळी ई-मेलद्वारे धमकी मिळताच दिल्ली पोलिसांनी तातडीने कारवाई करत विधानसभा परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला. पोलीस, बॉम्ब निकामी पथक, श्वान पथक आणि अग्निशमन दलाची पथके घटनास्थळी दाखल झाली. परिसराची कसून झडती घेण्यात आली. सखोल तपासानंतर कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. त्यामुळे ही धमकी खोटी असल्याचे निष्पन्न झाले. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून विधानसभेची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. ९ एप्रिल रोजी दिल्ली विधानसभा, सचिवालय, काही शाळा आणि मेट्रो स्थानकांना स्फोट घडवण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली होती.